दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–८१ सोमवार दि.१ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

कायदेशीर आणि राजकीयदृष्ट्या केजरीवाल बॅकफूटवर

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी आता संपली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षाच्या बहुमताचे नसले, तरी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार स्थानापन्न झाले आहे. या सरकारने आपला लोकसभा अध्यक्षही बिनबोभाट आणि सुरळीतपणे निवडून आणून पहिला महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या लोकसभा निवडणुकीविषयी अद्यापही विविध वृत्तवाहिन्या आणि प्रसारमाध्यमे यांच्यावर विविध अंगांनी चर्वितचर्वण होत आहे.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर यंदाही पाणी संकट?

» विभागातील ९३ लघू– मध्यम प्रकल्प अद्यापही कोरडेच

संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाड्यातील ७५० लघू व ७५ माध्यम प्रकल्पांपैकी ९३ लघू– मध्यम प्रकल्प कोरडे पडले आहेत. याशिवाय ४१७ लघू– मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. यंदा पाऊस काळ चांगला राहणार असा अंदाज सुरुवातीला आला. त्यामुळे सुरुवात चांगली झालेला पाऊस मराठवाड्यातील लघू, मध्यम, मोठ्या प्रकल्पांसह बंधाऱ्यांची तहान झपाट्याने भागवेल असे वाटत होते. परंतु जून संपत आला असताना मराठवाड्यातील प्रकल्पांची स्थिती

सुधारण्याचे नाव घेत नाही. दरम्यान, यामुळे बळीराजा यंदाही संकटाच्या कचाट्यात सापडतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

कुठे भरपूर तर कुठे अपेक्षितही नाही असे पावसाचे प्रमाण आहे. मराठवाड्यातील ७५० लघू प्रकल्पांपैकी ८७ प्रकल्प कोरडे पडले आहेत. त्यामध्ये सर्वाधिक ३२ प्रकल्प बीड जिल्ह्यातील असून, त्या पाठोपाठ धाराशिवमधील २१, छत्रपती संभाजीनगरमधील १८, जालन्यातील १३ व लातूरमधील तीन प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय ६ मध्यम प्रकल्प कोरडे पडले असून, त्यामध्ये बीडमधील सर्वाधिक ४, त्यापाठोपाठ जालना व धाराशिवमधील प्रत्येकी एका मध्यम प्रकल्पाचा समावेश आहे. ४१७ लघू मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. त्यामध्ये ३७८ लघू व ३९ मध्यम प्रकल्पांचा समावेश आहे. जोत्याखाली पाणीसाठा असलेल्या ३७८ लघू प्रकल्पात लातूरमधील ८४, धाराशिवमधील ८१, बीडमधील ६७, जालन्यातील ३९, छत्रपती संभाजीनगरमधील ३६, नांदेडमधील ३३ व परभणी, ◀◀ पान २ वर

उपयुक्त पाणीसाठा अकरा टक्क्यांवर

मराठवाड्यातील सर्व ८७७ प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा आताच्या घडीला ११.४० टक्क्यांवर आला आहे. मोठ्या ११ प्रकल्पांमध्ये १२.९२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. ७५ माध्यम प्रकल्पांत सर्वांत कमी ६.३७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असून, ७४९ लघू प्रकल्पात केवळ ८.१५ टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यांत ११.६५ टक्के तेरणा, मांजरा रेणा नदीवरील बंधाऱ्यात ३९ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्यावतीने देण्यात आली.

बीडचे भूमिपुत्र जितेंद्र भोपळे नगररचना विभागाचे संचालक

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या नगररचनाकार विभागाच्या संचालक पदी जितेंद्र लक्ष्मणराव भोपळे यांना पदोन्नती देण्यात आली असून, ते मराठवाड्यातील पहिले नगर रचनाकार विभागाचे संचालक आहेत. त्यांची नियुक्ती संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई या पदावर करण्यात आली आहे. ते मादोळमोही ता.गेवराई येथील रहिवासी असून बीड येथे स्थायिक आहेत. बीडच्या या भूमीपुत्राचा मागील वर्षीच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते हिरोजी इंदुलकर पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला होता.

बीड शहरातील शाहूनगर भागाचे रहिवासी असलेले जितेंद्र लक्ष्मणराव भोपळे यांचे प्राथमिक शिक्षण बीड शहरातील चंपावती व भगवान विद्यालय येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण बलभीम महाविद्यालयात झाले तर इंजिनिअरिंगचे शिक्षण नांदेडच्या गुरुगोविंदसिंग इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये झाले. त्यानंतर त्यांनी एलएलएम मुंबई विद्यापीठातून केले तर एम प्लॅन इंस्टिट्युट ऑफ टाऊन प्लॅनर दिल्ली या संस्थेतून केले . तसेच एमएसडब्लू (मास्टर ऑफ सोशल वेलफेअर) मुंबई विद्यापीठातुन केले. यापूर्वी त्यांनी नगर रचनाकार विभागात नियुक्ती झाल्यानंतर संभाजीनगर, बीड, मुंबई, ठाणे, पुणे, कोकण विभागाचे सह संचालक आदी ठिकाणी आपल्या कार्याचा ठसा उमटवला. मागच्या वर्षी त्यांना महाराष्ट्र शासनाच्यावतीने स्वराज्य अभियंता हिरोजी इंदुलकर या पुरस्काराने मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या या निवडीने नातेवाईक, स्नेहीजन, ◀◀ पान २ वर

मतांसाठी ओबीसी आंदोलन आमच्या बरोबरीला आणले

जरांगे पाटील यांची सरकारवर टीका, कायदा सुव्यवस्था राखण्याचेही केले आवाहन

बीड । प्रतिनिधी

ओबीसी आणि मराठ्यांची मते या सरकारला पाहिजेत म्हणून ओबीसी आंदोलन आमच्या बरोबरीने आणून बसवले आहे. अशा शब्दांत जरांगे पाटील यांनी सरकारवर टीका केली. ते म्हणाले, रोज ज्या घडामोडी घडत आहेत त्यात पोलिस त्यांचे काम करत आहेत. मात्र, केवळ मतांच्या राजकारणासाठी राज्याची कायदा–व्यवस्था बिघडू देऊ नका, असे आवाहनही मनोज जरांगे यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केले. ते बीडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

जरांगे पाटील म्हणाले, मी समाजासाठी काम करत आहे. मला सगळा समाज सारखा आहे. माझ्या समाजावर अन्याय झाला नाही पाहिजे ही आमची भूमिका असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. आमच्या गोरगरीब मराठ्यांवर अन्याय करू नका, त्यांच्यावर गुन्हे दाखल करू नका असे आवाहन जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांना केले. आमचा संयम ढळू देऊ नका असेही ते म्हणाले. विनायक मेटे यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे मत मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रात स्मारक व्हावे हे विनायक मेटे यांचे स्वप्न होते, त्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचेही जरांगे पाटील म्हणाले. राजकारणी लोकांना महापुरुष मतांपुरतेच हवे असतात असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. दरम्यान, छगन भुजबळ यांनी काही लोक काड्या लावण्यासाठी ठेवल्याचे जरांगे पाटील म्हणाले. आम्ही त्यांना दोष देत नाही, कारण सगळ्या गोष्टीचे मुकादम हे भुजबळ असल्याचे जरांगे म्हणाले. ओबीसी आणि मराठा बांधवांचे ◀◀ पान २ वर

नवी दिल्लीत ओवेसींविरोधात विहिंप, बजरंग दल आक्रमक

नवी दिल्ली । वृतसंस्था

संसदेत शपथविधी सोहळ्यादरम्यान जय पॅलेस्टाईन अशी घोषणा दिल्याबद्दल एआयएमआयएम खासदार असदुद्दीन ओवेसी यांचा विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने रविवारी (दि.३०) निषेध करण्यात आला. नवी दिल्लीतील ३४ अशोक रोड येथील ओवेसी यांच्या सरकारी निवासस्थानाबाहेर आंदोलन करण्यात आले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत प्रतिकात्मक पुतळा जाळण्यात आला.

हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांच्यावर संसदेत पॅलेस्टाईनवर विश्वास दाखवणे आणि इतर प्रसंगी जय इंडिया न बोलणे या मुद्द्यावरून भाजपसह विविध संघटनांकडून ओवेसी यांच्यावर टीका होत असताना ओवेसी यांनी संसद सदस्य म्हणून शपथ घेताना जय पॅलेस्टाईन म्हटले होते. या प्रकरणाबाबत त्यांना संसदेच्या सदस्यत्वापासून अपात्र ठरवण्याबाबत राष्ट्रपतींकडे तक्रार करण्यात आली आहे. विहिंपचे प्रदेश ◀◀ पान २ वर

आगामी विधानसभा महाविकास आघाडी म्हणूनच लढणार

मुख्यंमत्री पदाचा चेहरा जाहिर करण्यास नकार, शरद पवार यांची स्पष्टोक्ती

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विरोधी पक्ष महाविकास आघाडी (एमव्हीए) आगामी विधानसभा निवडणुका एकत्रितपणे लढविणार आहे. आमचा चेहरा हा महाराष्ट्राचा चेहरा असल्याचे सांगत मुख्यमंत्री पदासाठी कोणा एकाचा चेहरा लोकांसमोर जाहिर करून निवडणूकीला सामोरे जाणार नसल्याचे शरद पवार यांनी स्पष्ट केले. तसेच जागावाटपाची चर्चा लवकरच सुरू होईल, असे यावेळी पवार म्हणाले.

लोकसभा निवडणूकीनंतर येत्या ऑक्टोंबर–नोंव्हेबर महिन्यात राज्याच्या विधानसभा निवडणूका जाहिर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तसेच लोकसभा निवडणूकीत मिळालेल्या यशाप्रमाणे विधानसभा निवडणूकीतही यश मिळेल अशी अटकळ महाविकास आघाडीतील नेत्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. यापार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत भाष्य केले. शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, काँग्रेस आणि इतरांचा समावेश असलेला महाविकास आघाडी, या वर्षी ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुती आघाडीचा पाडाव करण्याचे उद्दिष्ट आहे. पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार म्हणाले की, आमचा फोकस एकच आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), उद्धव ठाकरे आणि काँग्रेस ◀◀ पान २ वर

उपेंद्र द्विवेदी यांनी स्विकारली लष्कर प्रमुख पदाची सुत्रे

नवी दिल्ली । वृतसंस्था

जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी ३० जून रोजी १.३ दशलक्ष भारतीय लष्कराचे ३० वे लष्करप्रमुख म्हणून जनरल मनोज पांडे यांच्याकडून पदभार स्वीकारला. लष्करप्रमुख मनोज पांडे हे चार दशकांहून अधिक काळ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.

संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी सीओएएस म्हणून कार्यभार स्वीकारला, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आणि आधुनिक युद्धाच्या बदलत्या स्वभावामुळे सुरक्षा क्षेत्रातील आव्हाने अधिक स्पष्ट होत आहेत, अशा वेळी जेव्हा जागतिक भौगोलिक–सामरिक वातावरण गतिशील ठेवणे गरजेचे असलेल्या कालावधीत द्विवेदी यांनी पदभार स्विकारल्याचे संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे. द्विवेदी यांच्यासाठी एकाच वेळी, देशाच्या संरक्षणास बळकटीकरणासह, असंख्य अपारंपरिक सुरक्षा ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू : ०.५० क्विंटल		
किमान	कमाल	सरासरी
२,३४१	२,३४१	२,३४१
ज्वारी/हायब्रिड : ४.०० क्विंटल		
२,१५०	२,४४१	२,३२२
मूग : १.०० क्विंटल		
७,२७६	७,५०१	७,३८८
तूर : ४.५० क्विंटल		
११,४४०	११,४४०	११,४४०
उडीद : ९.५० क्विंटल		
२,३३२	२,६००	२,४४४
बाजरी: ७.०० क्विंटल		
२,३७२	२,७००	२,५७१
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल		
१,७००	६,३००	४,०००
सोयाबीन: ८.५० क्विंटल		
४,४६०	४,४६०	४,४६०
हरभरा: १.५० क्विंटल		
४,७००	६,३००	५,५००

बीड जिल्ह्यातील चार पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

बीड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पोलीस दलात बदल्यांचे सत्र सुरु झालेले असून बीड जिल्ह्यातून चार पोलीस निरीक्षकांच्या बदल्या झालेल्या आहेत. विलास हिरामण पाटील,संतोष एकनाथ खेतमाळस यांची विनंतीवरून तर कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे हरिभाऊ नारायण खाडे, सुरेश सुधाकर चाटे यांची बदली करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यात लोकसभा निवडणूक पार पडल्यानंतर कालावधी पूर्ण झालेले अधिकारी आणि काही विनंती बदल्यावरून पोलीस दलात बदल्या होऊ लागल्या आहेत. रविवारी राज्यातील ३७९ अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. यात बीड जिल्ह्यातून विलास हिरामण पाटील, संतोष एकनाथ खेतमाळस, हरिभाऊ नारायण खाडे, सुरेश सुधाकर चाटे यांची बदली झाली आहे. तर राजेंद्र ◀◀ पान २ वर

राज्याच्या मुख्य सचिवपदी सुजाता सौनिक

नवी दिल्ली । वृतसंस्था

राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर निवृत्त होत आहेत. त्यांच्या जागी पहिल्यांदाच एका महिला आयएएस अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचे आदेश काढले आहेत. सुजाता सौनिक राज्याच्या मुख्य सचिव म्हणून धुरा सांभाळणार आहेत.

महाराष्ट्रात प्रथमच एका महिला आयएएस अधिकाऱ्याला मुख्य सचिवपदाची जबाबदारी मिळाली आहे.

सुजाता सौनिक या १९८७ च्या बॅचच्या आएएस अधिकारी असून, त्या पुढील वर्षी जूनमध्ये निवृत्त होणार आहेत. कडक स्वभाव आणि स्पष्टवक्ते अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्याकडे सध्या राज्याच्या गृहविभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदाचा कार्यभार आहे. त्यांना कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाच्या सचिव म्हणून बढती मिळाली होती. त्यांनी सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव म्हणूनही ◀◀ पान २ वर

पुण्यातून निघणार आज सर्वधर्मीय ऐक्याची दिंडी

पुणे । प्रतिनिधी

सध्या समाजामध्ये जातीपातीवरून वाद सुरू आहेत. त्यामुळे सर्वधर्मीय एकोपा राहण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढण्यासाठी सर्वधर्मीय ऐक्याची दिंडी सोमवारी पंढरीकडे निघणार आहे. ही दिंडी ऐक्याची प्रतिक ठरणार आहे.

पंढरपूर वारीनिमित्त सोमवारी पुण्यात सर्वधर्मीय ऐक्य दिंडी आयोजित करण्यात आली आहे. मुस्लिम को–ऑपरेटिव्ह बँक, रिझवानी मस्जिद ट्रस्ट, सुफी वारकरी विचारमंच आणि साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारुती मंदिर यांच्या विद्यमाने दि. १ जुलै रोजी सर्वधर्मीय ऐक्य दिंडीचे आयोजन सकाळी साडेदहा वाजता करण्यात आले आहे. साखळीपीर तालीम(नाना पेठ) येथे सर्वधर्मीय धर्मगुरु, डॉ. पी. ए. इनामदार युनिव्हर्सिटीचे कुलपती डॉ. पी. ए. इनामदार, साखळीपीर तालीमचे अध्यक्ष रवींद्र माळवदकर यांच्या उपस्थितीत प्रारंभ होणार असून अंगरशा बाबा दर्गा मार्गे रिझवानी मस्जिद (गंज पेठ) येथे समारोप होणार आहे. सहभागी वारकऱ्यांना व्हेज बिर्याणी, शीरखुर्मा वाटप करण्यात येणार आहे. डॉ. पी. ए. इनामदार युनिव्हर्सिटीच्या वतीने वारकऱ्यांना रेनकोट वाटप करण्यात येणार आहेत. दिंडीचे हे पाचवे वर्ष आहे.

अग्रलेख

कायदेशीर आणि राजकीयदृष्ट्या केजरीवाल बॅकफूटवर

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी आता संपली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षाच्या बहुमताचे नसले, तरी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार स्थानापन्न झाले आहे. या सरकारने आपला लोकसभा अध्यक्षही बिनबोभाट आणि सुरळीतपणे निवडून आणून पहिला महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या लोकसभा निवडणुकीविषयी अद्यापही विविध वृत्तवाहिन्या आणि प्रसारमाध्यमे यांच्यावर विविध अंगांनी चर्वितचर्वण होत आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या जागा घटल्या आणि विरोधकांच्या वाढल्या, हा मुद्दा प्रामुख्याने या चर्चांमध्ये अधोरेखित केला जात आहे. या सर्व चर्चात्मक गदारोळात एक महत्त्वाची बाब झाकोळली जाताना दिसते. ती म्हणजे आम आदमी पक्षाच्या स्थितीविषयीची.

आम आदमी पक्षाने यावेळी विरोधी पक्षांच्या आघाडीचा एक भाग म्हणून लोकसभा निवडणुकीत सहभाग घेतला. पण विसंगती अशी की दिल्लीत त्याने काँग्रेसशी युती केली पण पंजाबमध्ये मात्र, हे पक्ष परस्परांविरोधात लढले. दिल्लीत एकही जागा मिळाली नाही. तर पंजाबमध्ये काँग्रेसची सरशी झाली. एकंदर पाहता, या लोकसभा निवडणुकीत प्रत्येक प्रमुख विरोधी पक्षांच्या जागा मागच्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत वाढलेल्या दिसतात. तथापि, आम आदमी पक्ष हा एकच प्रमुख विरोधी पक्ष असा आहे, की ज्याच्या जागा मागच्या निवडणुकीपेक्षा कमी झाल्या आहेत. याचाच अर्थ असा की देशात काही राज्यांमध्ये विरोधी पक्षांना अनुकूल वातावरण असूनही हा पक्ष त्याचा लाभ उठवून आपली प्रगती करु शकलेला नाही. असे का झाले असावे, हा खरेतर चर्चेचा विषय व्हायला हवा होता. २०२९ ची म्हणजेच पुढच्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला सर्वात तगडे आव्हान आमचाच पक्ष देईल अशी भाषा या पक्षाचे नेते आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी एक महिन्यापूर्वीच केली होती. तथापि, आज लोकसभा निवडणुकीनंतर या पक्षाची परिस्थिती अधिकच कठीण होताना दिसत आहे. दोन वर्षांपूर्वीपासून देशभरात गाजत असलेला मद्यधोरण घोटाळा या पक्षाच्या चांगलाच अंगाशी आलेला दिसतो. प्रत्यक्ष दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांनाही या प्रकरणात कारागृहात जाण्याची वेळ आली आहे. प्रथम ईडीने त्यांची कोठडी घेतली होती. नंतर त्यांना न्यायालयीन कोठडीत आणण्यात आले. आता सीबीआयने त्यांना कचाट्यात घेतले असून त्यांना तीन दिवसांची सीबीआय कोठडीही देण्यात आली आहे. ईडी प्रकरणात जामीन मिळविण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. पण सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊनही त्यांची डाळ शिजली नाही. विशेष ईडी कनिष्ठ न्यायालयाने त्यांना क्षणभरापुरता दिलासा दिला आणि त्यांचा जामीन संमत केला. पण कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाची पूर्ती होण्याआधीच या आदेशाला दिल्ली उच्च न्यायालयाकडून स्थगिती मिळाली. नंतर उच्च न्यायालयाने अंतिम निर्णय देताना ही स्थगिती कायम ठेवली. त्यामुळे केजरीवाल यांची कारागृहातून बाहेर येण्याची ही वाटही बंद झाली. ते सर्वोच्च न्यायालयातही पोहचले. पण उच्च न्यायालयाने अंतिम निर्णय दिल्याशिवाय आम्ही या प्रकरणात हस्तक्षेप करणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्याने त्यांना तेथेही निराशा पदरी पडली. अखेर त्यांनी सर्वोच्च न्यायालयातील स्थगिती प्रकरणासंबंधीची याचिका मागे घेतली. आता त्यांना ईडी आणि सीबीआय अशा दोन अन्वेषण संस्थांशी न्यायालयीन संघर्ष करावा लागणार आहे. एका प्रकरणात जामीन मिळविता मिळविता त्यांच्या नाकीनऊ आले आहेत आणि अजूनही जामीन नाहीच. त्यात आता सीबीआयची भर पडली आहे. केजरीवाल आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा आहेत. त्यामुळे त्यांच्या या स्थितीचा परिणाम त्यांच्या पक्षावरही होऊन पक्षाची प्रतिमा, त्यांनी कितीही इन्कार केला तरी, मलीन झाली आहे, हे निश्चित आहे.

या स्थितीला ते स्वत: जबाबदार आहेत. त्यांनी गेले वर्षभर ईडीची अनेक समन्स टाळली. प्रथम समन्स येताच ते ईडीसमोर उपस्थित झाले असते तरी त्यांना अटक झालीच असती. पण जामीन मिळविण्यासाठी पुरेसा कालावधी मिळून ते एव्हाना बाहेर आलेही असते. पण त्यांनी ईडीची सात आठ समन्स का टाळली हे समजू शकत नाही. असे केल्याने त्यांना जनतेची सहानुभूती आणि लोकसभेची निवडणूक दोन्ही गमवावे लागल्याचे दिसते. दुसरा मुद्दा असा की, ज्या काँग्रेसवर त्यांनी काही वर्षांपूर्वी अनेक गंभीर आरोप केले होते. त्याच काँग्रेसशी त्यांनी यंदा युती केली. त्यामुळेही मतदाराच्या मनात त्यांच्याविषयी काहीसा अविश्वास निर्माण झाला असावा. त्यांच्या या धरसोड वृत्तीमुळे त्यांची हानी झाली आहे काय, याचा त्यांनीच गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. कायदेशीर आणि राजकीय अशा दोन्ही आघाड्यांवर आज ते आणि त्यांचा पक्ष मागे पडताना दिसत आहेत. त्यांनी त्यांच्या धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे, असे वाटते. तरच भविष्यासंबंधी त्यांना आशा बाळगता येईल, असेही सध्याच्या त्यांच्या स्थितीवरुन दिसून येत आहे.

हरित क्रांतीचे प्रणेते, महानायक, वसंतरावजी नाईक

वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी बंजारा समाजात सौ.हुंणकाबाई व फुलसिंग नाईक या दांपत्या पोटी मौजे गहुली ता.पुसद जि.यवतमाळ या ठिकाणी झाला. वसंतराव नाईक यांचे आजोबा चतुरसिंग (राठोड) नाईक यांनी हे गाव वसवले होते. चतुरसिंग हे तांडयाचे प्रमुख असल्या कारणाने लोक त्यांना नाईक म्हणत.

वसंतराव नाईक यांचे बालपण गहुली या गावी गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे सभोवतालच्या गावी, पोहरा देवी, उमरी, भोजला, बान्सी, या ठिकाणी झाले. जे की, आज पोहरा देवी हे जगातील बंजारा समाजाचे अराध्य दैवत म्हणून ओळखले जाते. त्या काळी वाहनाची सोय नसल्यामुळे दररोज चार-पाच मैल चालत जावून येणे, मोठया जिद्दीने व कष्टाने त्यांनी शिक्षण घेतले. लहानपणापासून चाणाक्ष बुध्दी व वाक्पटुता यामुळे पुढील व्यक्तीवर चांगला प्रभाव पडत असे. नाईक साहेब यांना क्रिकेट या खेळाची खुप आवड होती. शिलबंद गळ्याचा कोट त्यांना खुप आवडत.

सन १९३३ मध्ये नाईक साहेब यांनी निलसिटी विद्यालय, नागपूर येथून मॅट्रीक परिक्षा उत्तीर्ण झाले. पुढे त्यांनी मॉरीस कॉलेज नागपूर येथून बी.ए. पदवी पर्यंत शिक्षण घेवून १९३७ मध्ये बी.ए. पदवी ही संपादन केली. त्यानंतर नागपूर शहराचा प्रभाव नाईक साहेबांच्या जीवनात फार महत्वाचा ठरला. तेथे त्यांच्यात अमुलाग्र बदल होत गेला. वाचनाची उदंड आवड असल्यामुळे महात्मा फुले व अन्य समाजसुधारकाचे वाचन त्यांनी केले. पुढे १९४० साली नागपूर विधी महाविद्यालयातून एल.एल.बी. ही पदवी संपादन केली. सन १९४१ साली प्रख्यात वकील कै.बॅरिस्टर पंजाबराव देशमुख यांच्या बरोबर व नंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद येथे स्वतंत्र वकीली व्यवसाय सुरू केला. वकीली व्यवसायात त्यांनी दीनदुबळया, दलीत गोरगरीबांना मदतीचा हात देवून विविध अडचणीतून बाहेर काढण्याचे प्रयत्न केले व त्यांना त्यात यश आले. डॉ.पंजाबराव देशमुख या नेत्याच्या मार्गदर्शनाखाली एक धडाडीचा समाजकार्यकर्ता म्हणून वसंतराव नाईक साहेबांची ओळख संपूर्ण यवतमाळ जिल्हयात पसरली.

आंतरजातीय विवाह

महाविद्यालयीन जीवनामध्ये त्यांचा घाटे या ब्राम्हण समाजातील कुटूंबाबरोबर चांगले संबंध निर्माण झाल्यामुळे वयाच्या २८ व्या वर्षी त्यांनी कु.वत्सला घाटे या ब्राम्हण समाजातील मुलीबरोबर दि.६ जुलै १९४१ रोजी नोंदणी पध्दतीने विवाह केला. आणि जीवनातील पहिली क्रांती वसंतरावांनी केली. त्याकाळी आंतरजातीय विवाह आणि नोंदणी पध्दतीने विवाह केला, यालाच क्रांती म्हणावी लागेल. बंजारा समाजातील असणार्या अनिष्ठ रूढी-परंपरा यात बदल घडवून आणण्यासाठी वसंतरावांनी पुढाकार घेतला.

राजकीय प्रवास

वसंतरावजी नाईक साहेबांनी अल्पावधीत वकीली व्यवसायात प्रसिध्दी मिळाल्यामुळे बॅ.पंजाबराव देशमुख यांच्या मार्गदनाखाली काँग्रेस पक्षात प्रवेश केला. सन १९४३ मध्ये तालुका काँग्रेस समितीचे ते अध्यक्ष झाले. १९४६ मध्ये त्यांनी पुसद नगर पालिका निवडणूक लढविली. व त्यात विजयी होवून त्यांची पुसद नगरपालीकेचे नगराध्यक्ष म्हणून निवड झाली.

सन १९४६ ते १९५२ हया काळात ते पुसद नगर पालीकेचे नगराध्यक्ष होते. देशाच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूका १९५२ मध्ये पार पडल्या. १९५२ मध्ये वसंतरावजी नाईक साहेब हे पुसद मतदार संघातून निवडणून आले. पण हा मतदार संघ मध्यप्रदेशात येत असल्यामुळे त्यांना त्या राज्यात मंत्रीमंडळात महसुल खात्याचे उपमंत्रीपद दिले गेले. नंतर १९५६ च्या राज्य पुनर्रचनेनंतर भाषावार प्रांतरचना नुसार मराठवाडा, विदर्भ व जुनी मुंबई (महाराष्ट्र) या राज्यात यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रीमंडळात सहकार कृषी व दुग्ध व्यवसाय या खात्याचे मंत्री झाले. १९५७ साली दुसर्या पंचवार्षीक निवडणूकीत ते पुसद या मतदार संघातून दुसर्यांदा निवडणून आले. व मंत्रीमंडळात कृषिमंत्री म्हणून काम पाहिले.

दि.३ सप्टेबर १९६० रोजी वडील फुलसिंग चतुरसिंग नाईक यांचे निधन झाले. मुंबईहून वाहनाचा ताफा निघाला. दुष्काळ जानवत होता. शेतकर्यांना वाटेत भेटत होते. व त्यांची शेतीबाबत विचारपूस करत होते. साहेबांनी गोरगरीब, दीन-दलीत, दुबळया मुलांना उच्च शिक्षण मिळावे, आणि ते पुसद या ठिकाणी मिळावे, म्हणून १९६० मध्ये त्यांनी जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. दि.२८ जुन १९६१ रोजी जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित फुलसिंग नाईक कॉलेजची स्थापना करून ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली. दि.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची नवनिर्मिती झाली. व वसंतरावजी नाईक साहेब हे पहिले महसूल झाले९ बनले. या काळात कमाल जमीनधारणा संबंधी कायदा संमत केला. वर्षानुवर्षे जनीनदाराकडे हजारो हेक्टर जमीन पडून असल्याची खात्री केली. त्या जमीणीचे उत्पादन क्षमता वाढावी व शेतकर्यांना त्याचा अधिकार मिळावा. हा कायदा तयार करणारे आणि अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.

नाईक जिल्हा निर्मीतीचे शिल्पकार

वसंतरावजी नाईक समितीच्या शिफारशीवरून जिल्हयाचे कामकाज पाहण्यासाठी त्रिस्तरीय योजना अंमलात आली. जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा परिषद, तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समिती, आणि गावाच्या ठिकाणी ग्रामपंचायत, ग्रामीण भागातील लोकांना वाव मिळावा, लोक सरकारच्या कारभारात सामील व्हावेत, हा उद्देश ठेवून नाईक साहेबांनी जिल्हा परिषदेमध्ये लोकांच्या अडीअडचणी समजून घेणारा प्रतिनिधी म्हणून जिल्हा परिषद अध्यक्ष हा लोकांमधून निवडून येणारा सदस्य असावा. तसेच तालुकास्तरावर तालुक्याच्या अडचणी समजून घेणारा पंचायत समिती सभापती हा लोकांमधून निवडणून आलेला सदस्य असावा. तसेच गावपातळीवर गावाचा कारभार पाहण्यासाठी सरपंच हा लोकांमधुन निवडणून येणारा सदस्य असावा, म्हणजे जिल्हा, तालुका, आणि गावस्तरावरील अडीअडचणी सोडवून गावांचा विकास साधता येईल. अशी नाईक साहेबांनी शिफारस केली आणि केंद्राने सुध्दा सदर शिफारस स्विकारली. व इतर राज्यात लागू केले.

सन १९६२ मध्ये तिसर्या पंचवार्षीक निवडनुकीमध्ये वसंतरावजी नाईक साहेब विधान सभेवर निवडून गेले. याच काळात चीन आणि भारत युध्द चालू असल्यामुळे केंद्रामध्ये यशवंतराव चव्हाण यांना केंद्रात संरक्षणमंत्री पदी पाचारण करण्यात आले. त्यामुळे पुढील मुख्यमंत्री कोण अशी चर्चा काँग्रेस पक्षश्रेष्ठीत सुरू झाल्यानंतर ज्येष्ठतेनुसार महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री म्हणून दादासाहेब कन्नमवार यांची निवड करण्यात आली. दुदैवाने कन्नवार यांचे एक वर्षाच्या आत दुख:द निधन झाले. पुन्हा एकदा मुख्यमंत्री निवडीसाठी चर्चेला उधाण आले. पक्षश्रेष्ठीच्या निवडीनुसार सर्वानुमते वसंतरावजी नाईक साहेब यांचे नाव समोर आले.

महाराष्ट्राचे तिसरे मुख्यमंत्री म्हणून दि.५ डिसेंबर १९६३ रोजी वसंतरावजी नाईक साहेबांनी मुख्यमंत्री पदाची पहिली शपथ घेतली. महाराष्ट्राची धुरा संभाळत असतांना तेव्हाचा काळ अडचणीचा होता. १) भारतावर दोनवेळा आलेला युध्दाचे संकट (चीन आणि पाकिस्तान) २) कोयनेचा भुकंप (११ डिसेंबर १९६६) त्यानंतर १९७२ अशी संकटाची मालीका झेलत असतांना वसंतरावजी नाईक साहेबांनी संकटाना आव्हान समजून प्रगतीच्या वाटेवर नेली. दुष्काळाच्या काळात जनता अन्नास मोताल झाली होती. आणि सगळीकडे अन्नावाचून भूकबळीचे प्रमाण वाढत होते. वसंतरावांनी महाराष्ट्र अन्नधान्न स्वयंपूर्ण करण्याची भीष्मप्रतिज्ञा घेतली. पुण्याच्या शनीवार वाडयासमोर दि.३ ऑक्टोबर १९६५ रोजी भल्यामोठया सभेत त्यांनी घोषणा केली.ङ्क येत्या दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही तर जाहीरपणे फाशी घेईल . त्यांच्या या घोषनेनंतर टीका टिपण्णी झाली. मात्र यामधून प्रशासन आणि शेतकर्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी भरघोष उत्पादन देणार्या हायब्रिड ज्वारीच्या वाणाला त्यांनी प्रोत्साहन दिले.

अर्जुन जनार्धन चव्हाण
कृषि पर्यवेक्षक,शसकीय
फळरोपवाटिका राजुरी(न.)ता.जि.बीड

या संकरीत वाणाचा प्रयोग त्यांनी स्वत: सेलु येथील शेतीत केला. शुभ्रदाण्यानी लगडलेली हातभर लांबीची कणसे पाहून शेतकर्यांची डोळे भारावून आले. एखाद्या झपाटलेल्या शास्त्रज्ञाप्रमाणे वसंतराव शेतकर्याच्या बांधावर पोहोचले.मुख्यमंत्राच्या गाडयांचा ताफा रस्त्यात थांबवून रस्तेलगतच्या शेतात संक्रीत ज्वारीच्या वाणाचा प्रचार आणि प्रसार केला. भरघोष पीक काढणार्या शेतकर्याच्या पाठीवरून शाबासकीची थाप टाकत असत. पाण्याच्या बाबतीत ते नेहमी म्हणत, तुम्ही शेतीला काहीही करून पाणी द्या, ती भिजवा, धरणाच्या पाण्याने, विहिरीने, नाल्याचे पाणी द्या, ओंजळीने पाणी द्या. हेही होत नसेल तर घाम गाळून का होईना शेती भिजवा. नाईक साहेब नेहमी *शेतकर्यांना स्फूर्ती व प्रेरणा देत असत.

मराठी भाषेला राजभाषचा दर्जा- महाराष्ट शासनाची राजभाषा मराठी असल्याची घोषणा वसंतरावजी नाईक साहेबांनी १ मे १९६६ साली केली. सन १९६७ साली चौथ्या पंचवार्षीक निवडणूकीत पुसद तालुक्यातून चौथ्यार्यांदा वसंतराव नाईक साहेब विधानसभेवर निवडणून गेले. मुख्यमंत्र्याच्या कारकीर्दीत चांगले काम केल्यामुळे काँग्रेस पक्षाच्या वतीने २०२ आमदार निवडून आणले. व १९७२ च्या निवडणूकीत २२२ आमदार निवडून आले. ही किमया आजपर्यंतच्या एकाही पक्षाला साधता आली नाही, ती वसंतरावजी नाईक साहेबांनी करून दाखविली.

दि.६ मार्च १९६७ ला दुसर्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर साहेबांनी शेतकर्यांसाठी खुप मोठे कार्य केले.

१) शेतकर्यांच्या समस्या, शेतीच्या येणार्या अडचणी महाराष्ट्राचे हवामानानुसार मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र या भागातील शेतकर्यांना समान न्याय, वेळेवर तिन्ही हंगामात मार्गदर्शन मिळावे, तसेच संशोधन होवून नवनवीन प्रयोग व्हावे. यासाठी चारही विभागात चार कृषि विद्यापीठे मुख्यमंत्री असतांना दिले व उल्लेखनीय कार्य केले.

२) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी- सन १९६९.

३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, सन १९७१.

४) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली- सन १९७२.

५) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी- १९७२. समान न्याय देणारे कृषि विद्यापीठ देवून वसंतरावजी नाईक साहेब शेतकर्यांचे दैवत झाले. आज या विद्यापीठातून हजारो विद्यार्थी शेतीविषयक शिक्षण घेवून प्रशासनात, शेती, व्यवसायात प्रगती केलेली आहे, ही नाईक साहेबांची देण आहे.

६) एकाच वेळेस पन्नास लाख लोकांना रोजगार हमी योजनेत काम देवून योजना राज्यात राबविली. सदर योजना केंद्रात महात्मा गांधी रोजगार हमी योजना नावाने चालू आहे.

७) कोरडवाहू शेतीला सिंचनाची जोड म्हणून पाणी अडवा पाणी जिरवा या मूलमंत्राचा पुरस्कार करून शेतात बांध टाकून पाणी अडवले व शेतीपुरक उद्योगाला चालना दिली.कुकूटपालन, पशूपालन, दुग्धउत्पादन या सारख्या प्रयोगाचे धडे स्वत:च्या सेलु येथील शेतीमधून दिले.

८) गोरगरीबांच्या मुलांसाठी जिल्हानिहाय आश्रमशाळा काढून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले.

सन १९७२ च्या पंचवार्षीक निवडणूकीत पाचव्यांदा विधानसभेवर निवडून गेले व दि.१४ मार्च १९७२ रोजी तिसर्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या काळात शेतकर्यांची होणारी दलालापासून होणारी पिळवणूक थांबण्यासाठी सन १९७२ ला कापूस एकाधिकार योजना अंमलात आणली. १९७७ मध्ये वाशिम लोकसभा मदतार संघातुन लोकसभेवर खासदार म्हणून निवडून गेले. तसेच बिहारचे राज्यपाल पद पण त्यांनी नाकारले, कारण त्यांना महाराष्ट्राची सेवा करायची होती.

महाराष्ट्र अंधारमुक्त करण्यासाठी औष्णिक प्रकल्प- कोरडी, खापरखेडा, तसेच पारस आणि परळी वीज केंद्राची सुरूवात नाईक साहेबांच्या काळात झाली. तसेच उजनी धरण, जायकवाडी धरण, आरुणावती, अप्पर वर्धा, या धरणाची कामे नाईक साहेबांच्या काळात झाली. अशा महामानवाचा दि.१८ ऑगस्ट १९७९ साली वयाच्या ६६ व्या वर्षी सिंगापूर येथे काळाने झडप घातली. एका वादळाच्या वंशाजाचा झाला झाला. २० ऑगस्ट १९७९ रोजी गहुली या गावी अंत्यदर्शन आणि अंत्यसंस्कार करण्यात आले. आशा महान कार्य करणाऱ्या मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेबांना १११ व्या जयंती निमित्त कोटी-कोटी विनम्र अभिवादन .

पान १वरून...

मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर

हिंगोली येथील प्रत्येकी १९ लघू प्रकल्पांचा समावेश आहे. जोत्याखाली पाणीसाठा गेलेल्या ३९ माध्यम प्रकल्पात छत्रपती संभाजीनगर व धाराशिव मधील प्रत्येकी ११, बीडमधील ६, जालन्यातील ५, लातूरमधील ३, परभणीतील २ व नांदेडमधील एका प्रकल्पाचा समावेश आहे. पावसाळा अजून बाकी आहे. परंतु प्रकल्पांची आत्ताची स्थिती चिंता वाढविणारी आहे.

मतांसाठी ओबीसी

भुजबळ वाटोळे करत असल्याचेही जरांगे पाटील म्हणाले. माझ्या गोरगरीब मराठ्यांवर अन्याय होऊ देऊ नका असे मी देवेंद्र फडणवीस यांना आवाहन करत असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. मराठ्यांचा संयम ढळू देऊ नका असेही जरांगे पाटील म्हणाले. बीडचा पालकमंत्री तुमचा म्हणून मराठ्यांवर अन्याय करता का? असा सवालही त्यांनी केला.

बीडचे भूमिपुत्र जितेंद्र भोपळे

तसेच मित्रपरिवारात विशेष आनंद व्यक्त केला जात असून, बीडमधून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. बीड मधील माजी नगरसेवक ॲड. धर्मेंद्र भोपळे यांचे ते बंधू आहेत. जितेंद्र भोपळे मोठ्या पदावर असूनही जुन्या मित्रांशी आणि आपल्या गावाशी नाते जपणारा अधिकारी अशी त्यांची ओळख आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्र मध्ये असलेल्या मित्र परिवाराकडून त्यांचे विशेष अभिनंदन होत आहे.

उपेंद्र द्विवेदी यांनी स्विकारली

आव्हानांना प्रतिसाद देण्याचे धोरण त्यांच्यासाठी प्राधान्य धोरण राहणार असल्याचे, असे निवेदनात म्हटले आहे. १ जुलै १९६४ रोजी जन्मलेले लेफ्टनंट जनरल द्विवेदी यांना १५ डिसेंबर १९८४ रोजी लष्कराच्या इन्फंट्री (जम्मू आणि काश्मीर रायफल्स) मध्ये नियुक्त करण्यात आले. नौदल प्रमुख ॲडएम दिनेश के. त्रिपाठी यांच्याप्रमाणेच ते मध्य प्रदेशातील रेवा येथील सैनिक शाळेचे माजी विद्यार्थी आहेत. जनरल उमेंद्र द्विवेदी यांनी आतापर्यंत कमांड ऑफ रेजिमेंट (१८ जम्मू आणि काश्मीर रायफल्स), ब्रिगेड (२६ सेक्टर आसाम रायफल्स), डीआयजी, आसाम रायफल्स (पूर्व) आणि ९ कॉर्प्स आदी सैनिकी तुकड्यांचे नेतृत्व केले. जनरल पांडे हे यापूर्वी ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणार होते कारण ते ६२ वर्षांचे झाले होते परंतु नवीन प्रमुखाची घोषणा होण्यास विलंब झाल्याने त्यांना सेवेत एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. जनरल पांडे यांना एका महिन्याच्या मुदतवाढीमुळे लष्करी बंधूंमध्ये संभाव्य अतिक्रमण आणि सेवा प्रमुखांच्या नियुक्तीतील ज्येष्ठतेच्या तत्त्वापासून विचलनाची शक्यता निर्माण झाली होती. तथापि, ११ जून रोजी रात्री उशिरा झालेल्या घोषणेनुसार सरकारने त्यांची उपप्रमुख लेफ्टनंट जनरल द्विवेदी, जे सर्वात वरिष्ठ होते, यांना सर्वोच्च पदावर नियुक्त केले.

आगामी विधानसभा महाविकास आघाडी

एकत्र लढणार आहेत. जागावाटपाबाबत लवकरच चर्चा होईल. आमच्या हातात तीन महिने आहेत असेही यावेळी त्यांनी सांगितले. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, लोकसभा निवडणूका आताच झालेल्या असून आता एकही खासदार पुन्हा निवडणूकीसाठी तयार नाही. त्यामुळे सध्या इतर पक्षातील कोणी नाराज आहेत किंवा सध्याच्या सरकारच्या विरोधात भावना असलेले कोणीही पक्ष बदल करतील असे वाटत नसल्याचे दिसून येत आहे. जागा वाटपाला सुरुवात झाल्यानंतर छोट्या मित्र पक्षांची जबाबदारी महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षावर सोपविण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगितले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही युती कायम राहण्याचे संकेत नुकतेच दिले आहेत.

नवी दिल्लीत ओवेसींविरोधात

सरचिटणीस सुरेंद्र गुप्ता म्हणाले की, देशाचे विभाजन करण्याची ही घातक प्रवृत्ती आहे, ज्यामुळे देशाचे विभाजन झाले. खेदाची गोष्ट म्हणजे ओवेसी हे खासदार आहेत, ज्यांच्यासाठी राज्यघटना आणि देश सर्वोच्च असला पाहिजे, पण त्यांच्यासाठी त्यांचे राजकारण अधिक महत्त्वाचे आहे. देशाचे विभाजन करण्याचे हे राजकारण आता मान्य होणार नाही.

राज्याच्या मुख्य सचिवपदी

काम पाहिले आहे. सार्वजनिक आरोग्यासह इतर विभागातही त्यांनी काम केले आहे. सुजाता सौनिक यांना जिल्हा, राज्य आणि संघराज्य स्तरावर आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये आरोग्य सेवा, वित्त, शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन आणि शांतता, सार्वजनिक धोरण आणि प्रशासनाचा ३० वर्षांचा अनुभव आहे. त्यांचे पती मनोज सौनिक यांची एप्रिल-डिसेंबर २०२३ पासून सीएस म्हणून नियुक्ती केली होती. सध्या ते मुख्यमंत्र्यांचे प्रमुख सल्लागार म्हणून काम पाहत आहेत. दरम्यान, मागील वर्षी ३१ डिसेंबर रोजी नियुक्त झालेले करीर या वर्षी मार्चमध्ये निवृत्त होणार होते. परंतु लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती.

बीड जिल्ह्यातील चार

हरिभाऊ बहिरट सोलापूर शहरवरून तर सोमनाथ मधुकर जाधव यवतमाळवरून बीडला येत आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षकांमध्ये राहुल एकनाथ आघाव, बाळासाहेब गंगाराम आघाव, अविनाश अशोक राठोड, संतोष गुलाब मिसळे, धरणीधर बाब कोळेकर, नीता खंडूजी गायकवाड, घनशाम लालेश्वर अंतरप, भास्कर देवराव नवले, आनंद शिवाजी कांगुणे, राजधर मुरलीधर पठाडे, अनघा अंकुश गोडगे यांचा बदलीत समावेश आहे. बीड जिल्ह्यात छत्रपती संभाजीनगरवरून सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम धर्मराज सिरसाट बीडला आले आहेत. पोलीस उपनिरीक्षकांमध्ये विजय सुधाकर थोटे, अर्चना दिलीप भोसले, ज्ञानेश्वर दशरथ गव्हाणे, बाबासाहेब रामभाऊ खरात, सचिन सुखदेव दाभाडे यांच्या जिल्ह्यातून बदल्या झाल्या असून छत्रपती संभाजी नगर ग्रामीण वरून स्वप्नील लक्ष्मण भोजगुडे तर धाराशिववरुन तुकाराम रघूनाथ बोडखे बीडला येत आहेत. दरम्यान पोलीस उपनिरीक्षकांमध्ये मीना भिवसन तुपे यांना एक वर्ष मुदतवाढ मिळाली आहे.

भुशी डॅममागच्या डोंगरातील धबधब्यात ५ जण वाहून गेले, लहान मुलं-महिलांचा समावेश, शोधकार्य सुरु

पुणे । प्रतिनिधी

वर्षाविहारासाठी लोणावळ्यातील भुशी डॅम परिसरात पर्यटनासाठी आलेले एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेले आहेत.भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या डोंगरातील वॉटर फॉल येथून हे अन्सारी कुटुंब वाहून गेले आहेत. ग्रामस्थ, वन्यजीव रक्षक, पोलीस यांच्या मदतीने शोधमोहीम सुरू आहे मात्र, त्याचा शोध लागला नाही.

भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या डोंगरातील धबधब्याला रेल्वेचा वॉटर फॉल म्हणून ओळखलं जातं.अन्सारी कुटुंब रविवारी परिवारासोबत वर्षाविहारासाठी या परिसरात आले होता. पाण्याच्या प्रवाहात भिजण्याचा आनंद घेण्यासाठी कुटुंब . मात्र, पाण्याला वेग असल्याने वाहून गेले. ऐकमेकांना वाचवण्यासाठी प्रयत्नात वाहून गेल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. धबधब्यातील पाण्याचा प्रवाह भुशी धरणात येते, तिथं शोधकार्य सुरू आहे. आतापर्यंत दोन जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहे. वाहून गेलेल्यांपैकी लहान मुलांचा आणि महिलांचा समावेश आहे.

पर्यटकांची पंढरी समजल्या जाणाऱ्या लोणावळ्यातील भुशी धरण ओव्हरफ्लो झाले आहे. लोणावळा परिसरात शुक्रवार, शनिवारी झालेल्या जोरदार पावसाच्या सरी आणि आज रविवारी सकाळपासून झालेला पाऊस यामुळे भुशी धरणाच्या सांडव्यावरून पाणी वाहू लागले आहे. पावसाळा आला की पुणेकरांचे सहलीचे प्लॅन असतात त्यात लोणावळ्याच्या भुशी डॅमवर पर्यटक गर्दी करतात. पावसाळ्यात लोणावळ्याचं वातावरण आल्हाददायक असतं. त्यामुळे हजारो पर्यटक या ठिकाणी पर्यटनासाठी येत असतात. मात्र काही पर्यटक जीवावर बेतणारे खेळ करतात. त्यामुळे दुर्घटना होते आणि परिणामी जीव जातो. त्यामुळे पर्यटकांनी अतातायीपणा करु नये, असं आवाहन पोलिसांकडून करण्यात येतं. मात्र पोलिसांकडे दुर्लक्ष करुन अनेक तरुण हुल्लडबाजी करताना दिसतात. लोणावळ्यात दरवर्षी अशी प्ररिस्थिती बघायला मिळते. त्यामुळे लोणावळ्यातील प्रत्येक पर्यटनाच्या ठिकाणी स्पीकरवरुन खबरदारीच्या सूचना दिल्या जातात. शिवाय काही ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त देखील असतो. वारंवार पोलिसांकडून आवाहन केलं जातं. सूचना दिल्या जातात. मात्र पर्यटक याकडे दुर्लक्ष करताना दिसतात.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. ०१ जुलै २०२४

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी भागवत गायकवाड

बीड । प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेचे कनकालेश्वर विद्यालय बीड येथे स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष मा. श्री.रतनशेठ चौरे यांच्या अध्यक्षतेखाली पालक शिक्षक मेळावा शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी संपन्न झाला.

पालक संघ, माता पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती,व विकास समिती यांच्या कार्यकारिणींच पुनर्गठन करण्यात आले. यामध्ये शाळा व्यवस्थापन समिती प्राथमिक अध्यक्षपदी मा. श्री.भागवत (नाना) गायकवाड व्यवस्थापन समिती माध्यमिक अध्यक्षपदी मा. श्री. दिलीप (नाना) ढेपे व पालक शिक्षक संघ उपाध्यक्षपदी सौ. ज्योतीताई राऊत व माता पालक संघ उपाध्यक्षपदी सौ.लक्ष्मीताई जाधव यांची निवड सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच विविध समित्याच्या कार्यकारणीत संवर्गनिहाय सदस्यांच्या निवडी सर्वांनुमते खेळीमेळीच्या वातावरणात करण्यात आल्या. विविध समित्यांच्या कार्यकारणीत निवड झालेल्या सर्व अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य यांचे विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपस्थित कनकालेश्वर प्राथमिक विद्यालयचे मुख्याध्यापक श्री. आव्हाड सर व माध्यमिकचे मुख्याध्यापक श्री. अंबादास शेकडे सर, श्री. विरेंद्र जाधव सर, श्री. मोराळे सर, श्री. ढाकणे सर, श्री.बांगर सर, श्रीमती.माने मॅडम, श्रीमती .सानप मॅडम, श्रीमती. कोरडे मॅडम, श्रीमती. शहाणे मॅडम, व शिक्षक पालक सह आदी उपस्थित होते

मातोरीतील परिस्थिती नियंत्रणात! गावात शांतता!

मातोरी । प्रतिनिधी

मातोरी गावात काल रात्री दोन गटात झालेल्या तुफान राड्यानंतर पोलिसांनी घटना स्थळी धाव घेत वेळीच परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळला आहे. दरम्यान रात्री उशिरा पालकमंत्री धनंजय मुंडे आणि खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी सोशल मीडियावरून जनतेला शांततेचे आवाहन केले आहे.

ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके हे गोपीनाथ गड येथून दर्शन घेऊन भगवान गडाला जाणार होते. त्यांच्या स्वागतासाठी तींतरवणी, माळेगांव येथील ग्रामस्थ दुचाकी रॅली आणि डी जे लावून पाडळशिंगी कडे निघाले होते. त्यांची रॅली मातोरी गावात आल्यानंतर रॅलीतील तरुणांनी त्या गावात डीजे लावून नाचण्यास सुरुवात केली. डिजेवर एक दोन गाणे डान्स केल्यानंतर मोठी ट्रॅफिक जॅम झाली. त्यामुळे मातोरी ग्रामस्थांनी या तरुणांना इथे डीजे वाजवू

नका म्हणून सांगितले. त्याच कारणावरून ग्रामस्थ आणि तरुणांमध्ये बाचाबाची झाली. यावेळी रॅली मधील काही तरुणांनी शिवीगाळ सुरू करीत एका हॉटेलवर दगड भिरकवण्यास सुरुवात केली. त्यानंतर दोन्ही बाजूंनी दगडफेकीला सुरुवात झाली. यात काही जणांना मार लागला आहे. तर चार ते पाच दुचाकीवर दगड मारून त्यांचे नुकसान करण्यात आले आहे. तर डिजेचे देखील नुकसान करण्यात आले आहे. तर महा मार्गावर गाड्या अडवून त्यांच्या काचा फोडण्याचे प्रकार देखील घडले आहेत. घटनेची माहिती समजल्यानंतर चकलंबा पोलिस आणि बीड जिल्ह्याचे राखीव पोलिस व इतर अधिकारी यांनी तातडीने गावात पोहोचून त्यांनी वेळीच परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.

अफवांचे पेव फुटले

प्रा लक्ष्मण हाके भगवान गडावर येणार म्हणून महा मार्गावर ठीक ठिकाणी ग्रामस्थांनी त्यांच्या स्वागताची तयारी केली होती. मात्र इकडे मातोरी ग्रामास्थामध्ये असा गैरसमज निर्माण झाला की आता दुसरा समूह हा आपल्या गावावर हल्ला करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे अनेकांनी आपापल्या नातेवाईकाना कॉल करून माहिती देण्यास सुरुवात केली. परिणामी दोन्ही समाजाचे लोक मोठ्या संख्येने मातोरी परिसरात जमण्यास सुरुवात झाली. मातोरि येथील कृष्ण नगर येथे दगडफेक देखील करण्यात आली असे आज ग्रामस्थ सांगत आहेत.

हाके यांचा पुढील दौरा रद्द

हाके काल भगवानगडहून चौंडीकडे निघणार होते. पहाटे त्यांनी भगवानगडाचे दर्शन घेतल्यानंतर पुढील दौरा रद्द करत असल्याची घोषणा त्यांचे सहकारी पी. टी. चव्हाण यांनी केली.

शांतता राखण्याचे पालकमंत्री मुंडे यांचे आवाहन

घटनेनंतर मंत्री धनंजय मुंडे यांनी ट्वीट केलं आहे. बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यात मातोरी परिसरात घडत असलेल्या घटनाक्रमावर मी लक्ष ठेवून आहे. पोलीस प्रशासनास तातडीने घटनास्थळी जाऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे निर्देश दिले आहेत. माझी बीड जिल्ह्यातील सर्व जनतेला विनंती आहे की कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा कोणीही प्रयत्न करू नये, तसेच जिल्ह्यातील सामाजिक सौहार्द बिघडू देऊ नये, असे धनंजय मुंडे यांनी ट्वीट करत म्हटलं आहे.

शांत रहा, शांतता बिघडवू नका प्रा. लक्ष्मण हाके

घटनेनंतर ओबीसी आरक्षण आंदोलक लक्ष्मण हाके यांनी दोन्ही समाजांना शांततेचे आवाहन केले आहे. ते म्हणाले लाठ्याकाठ्या हातात घेण्याचा काळ गेला, गावाची शांतता बिघडवू नका. आरक्षण मागणाऱ्या आणि आरक्षणाचं संरक्षण करणाऱ्या दोघांनी कायदा हातात घेऊ नये. शांत राहा, गावाची शांतता बिघडू नका, असे आवाहन लक्ष्मण हाके यांनी केले आहे. तसेच त्यांनी मातोरीच्या दगडफेकीच्या घटनेचा निषेध केला. ते बीडच्या तेलगाव येथे बोलत होते. आम्ही उपोषण आणि आंदोलनाच्या मार्गाने आम्ही आमची मागणी मागत आहोत. तरुणांनी कुठलाही कायदा हातात घेवू नका. दगडफेक आणि रस्ता रोको करु नका. गाडी फोडून दहशत माजवून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करत असतील तर मी त्याचा निषेध व्यक्त करतो. संविधानावर विश्वास ठेवा, भीती बाळगू नका. पोलीस प्रशासनाने कायदा सुव्यवस्था ठेवावी. लाठ्याकाठ्यांचा काळ गेला, गावाची शांतता बिघडवू नका. रोज एकमेकांची तोंड पाहायची आहेत. भांडण आणि हिंसा हा उपाय नाही, असे लक्ष्मण हाके यांनी म्हटले.

खा. बजरंग सोनवणे यांचेही शांततेचे आवाहन

माझ्या बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील मातोरी येथे घडलेल्या घटनेबाबत मी प्रशासनाशी बोललो आहे. प्रशासनाला ही सूचना केल्या की शांतता प्रस्थापित करण्यासाठी जे करता येईल ते करा. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, याची पूर्णपणे काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे. बीड जिल्ह्यातील तमाम जनतेला आवाहन करतो की, शांतता राखून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन खासदार बजरंग सोनवणे यांनी केले आहे.

पंकजाताई मुंडेंना राज्यसभेवर घेऊन केंद्रीय मंत्री करावे अन्यथा भाजपास भविष्यात मतदान करणार नाही -अशोक पाखरे

मानूर । प्रतिनिधी

दिनांक २९/०६/२०२४ रोजी मानूर ग्रामपंचायत येथे सरपंच अशोक मामा पाखरे यांच्या नेतृत्वाखाली सर्वानुमते असा ठराव घेण्यात आला की संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाला बळकटी नेण्याचे काम दिवंगत लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी १८ पगड जातींना विश्वासात सामावून घेत सन १९९५ मध्ये प्रथमच भाजप सत्तेत आणला होता त्यानंतर २०१४ या काळात भाजपा आज जो सत्तेत आहे त्यामागे आदरणीय लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचे योगदान मोठे प्रमाणात आहे असे असून सुद्धा मा. पंकजाताई मुंडे यांना

पक्षातीलच मोठ्या नेते कडून नेहमीच कोंडीत पकडण्याचे षडयंत्र केले गेले. या गलिच्छ राजकारणाने पंकजाताई यांच्यावर अनेक वेळा अन्याय झाला आहे अशातच गेल्या दीड दोन वर्षांपासून बीड जिल्ह्यातील सामाजिक एकात्मता बिघडली असून त्याचा परिणाम म्हणून काल झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंकजाताई यांना निसटत्या पराभवाला सामोरे जावे लागले. लोकसभेत बीड चे नेतृत्व जिल्ह्यातून पंकजाताई यांनी करावे असे सर्वच बीड जिल्ह्यातील मतदारांना मनोमन वाटत होते. परंतू आता या पराभवामुळे बीड जिल्ह्यातील अनेक महत्त्वाकांक्षी विकासाला खीळ बसणार असल्याने लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना राज्यसभेवर घेऊन ताबडतोब केंद्रीय मंत्री पद देऊन त्यांचे राजकीय पुनर्वसन करावे व या जिल्ह्यावर न्याय करावा, अन्याय आम्ही सहन करणार नाही. अन्यथा आम्ही मानूर ग्रामस्थ व पंचक्रोशीतील सर्वजण असे घोषित करतो की यापुढे आमचे मानूर गाव जाटवड, बडेवाडी, हनुमानवाडी, सोलेवाडी, बहिरवाडी आदी परिसरातून भारतीय जनता पक्षाला कदापिही मतदान करणार नाही. असा ठराव मानूर ग्रामपंचायत अंतर्गत (सरपंच) अशोक मामा पाखरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला आहे.

नवतरुण युवक युवतीने मतदार यादीत नाव नोंदणी करून घ्यावी-आ.लक्ष्मण पवार

गेवराई । प्रतिनिधी

विधानसभा मतदारसंघातील नवतरुण युवक युवती यांचे १८ वर्ष पूर्ण झालेले व लोकसभा निवडणुकीत ज्यांचे नाव गहाळ झाले त्यांनी तातडीने नावनोंदणी करून घ्यावी व काही अडचण आली तर आमच्या कार्यालयाशी संपर्क करून आपले नाव नोंदणी करून घ्यावी असे आव्हान आ.लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात ते म्हणाले की निवडणूक विभागा मार्फत नवीन नाव नोंदणी अभियान दि. २५ जून ते २५ जुलै पर्यंत राबविण्यात येणार आहे या दरम्यान मतदारांसाठी नवीन नाव नोंदणी, नाव व पत्ता दुरुस्ती, फोटो बदलणे, मतदारसंघ बदलणे, मयत व्यक्तीचे नाव कमी करणे, नंबर , आधारशी करणे, नवीन बनवणे या सर्व प्रकारच्या नोंदणी करण्याची मोहिम पुन्हा सुरु झाली आहे.

यासाठी फॉर्म-६ नविन नाव नोंदणीसाठी

फॉर्म- ६ आधार कार्ड हे मतदार कार्डला जोडण्यासाठी. फॉर्म- ७ नाव कमी करण्यासाठी... फॉर्म-८ नाव दुरुस्ती, वय, पत्ता यातील चुक दुरुस्तीसाठीआवश्यक कागदपत्रे १)पासपोर्ट साईज एक फोटो २)ओळखप्रत्रः पॅनकार्ड,जन्माचा दाखला, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स(यापैकी एक)

३)रहिवासी पुरावा- आधार कार्ड, पासपोर्ट कॉपी, वीज बील, मालमत्ता कर पावती,बँक पासबुक (यापैकी एक) इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत तरी सर्व नवतरुण युवक युवतीसह मतदारांनी आपले नाव नोंदवून घ्यावेत असे आवाहन आमदार लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे

पान ६ वरून...

आरोपीला पावसापासून

त्यातच आर्थिक गुन्ह्यातील आरोपींना पोलिसांकडून मिळणारी 'शाही' वागणूक आता संतापाचा विषय ठरत आहे.मोजक्याच लोकांसाठी असली शाही बडदास्त ठेवण्याच्या सूचना पोलिसांना नेमक्या कोणत्या अधिकाऱ्यांकडून आहेत आणि पोलीस अधीक्षक हे सारे का होऊ देत आहेत हे कळायला मार्ग नाही.

शनिवारी तर पोलीस काही खास आरोपींची बडदास्त कशी ठेवतात याचे ओंगळवाणे प्रदर्शन बीडच्या न्यायालय परिसरात पाहायला मिळाले.एका आर्थिक गुन्ह्याच्या प्रकरणातील एका आरोपीला शनिवारी बीडच्या न्यायालयात हजर करण्यात आले होते.त्या आरोपीबद्दल असलेला सामान्यांचा संताप लक्षात घेता त्याच्या भोवती पोलिसांची सुरक्षा असण्यात काही गैर नाही, मात्र सदर आरोपीला न्यायालयातून परत नेत असताना अचानक पाऊस सुरु झाला आणि मग आरोपीच्या अंगावर पावसाचा एक थेंबही पडू नये यासाठी पोलिसांनी जी धावाधाव केली,एक ऑटो थांबवून ठेवला, त्या आरोपीला बसविल्यानंतरही बाजूने पाऊस लागेल म्हणून पोलीस चक्क कंबरेपर्यंत वाकून रिक्षाच्या खुल्या बाजूला छत्री धरताना पाहायला मिळाले.एखाद्या आरोपीला देण्यात येणारी अशी वागणूक न्यायालयात उपस्थित असलेल्या ठेवीदारांच्या मनाला मात्र डागण्या देणारी ठरली.

गोळीबार कारण स्पष्ट

ठाण्यात रविवारी सकाळी शशिकांत उर्फ बबन गित्ते (रा. बँक कॉलनी), मुकुंद ज्ञानेश्वर गित्ते, वाघबेट, महादेव उद्धव गित्ते, बँक कॉलनी, राजाभाऊ नेहरकर, पांगरी, राजेश वाघमोडे, पिंपळगाव गाढे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनास्थळी छत्रपती संभाजीनगरचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अंबाजोगाईच्या अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक चेतना तिडके, अंबाजोगाई उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले, परळी शहरचे पोलीस निरीक्षक संजय लोहकरे, स पो नी राजकुमार ससाने, पोलीस उपनिरीक्षक शिंदे, डीबी पथकाचे जमादार भास्कर केंद्रे, दत्ता गित्ते, पांचाळ, गोविंद येलमटे व विष्णू फड इतर पोलिसांनी भेट दिली.

महापारेषण चे अधिक्षक अभियंता

कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला .यावेळी मिलिंद बनसोडे यांनी आधिक्षक अभियंता म्हणून उल्लेखनीय कार्य केले असून त्यांच्या कार्याचा यावेळी आढावा चीत्रफित द्वारे सादर करण्यात आला .यावेळी मिलिंद बनसोडे म्हणाले की, परळीत येण्यापूर्वी भीती चे वातावरण असल्याचे सांगण्यात आले होते पण तसे काही नव्हते उलट छान वातावरण पहायावस मिळाले .परळी येथे अभियंता पदाची सेवा अत्यंत आनंदात आणि खेळी मेळी च्या वातावरणात करता आली .येथील अधिकारी कर्मचारी व कंपनीचे एजन्सी यांच्यात चांगला समन्वय असल्याने अवघड काम करणे सोपे झाले आहे. कार्यक्रमाचे संचालन संभाजीनगर येथील वरिष्ठ व्यवस्थापक मनीषा दुसाने यांनी केले यावेळी जाधवर, पारपल्लीवार, लक्ष्मीकांत दगडगुंडे,घोडके ,कानडे,बालासाहेब चाटे, व्यवस्थापक प्रमोद आकरे, प्रवीण फड, सोमनाथ सिरसाट, अजय वाल्मिकी, परमेश्वर करडे, नितीन मुंडे, शशिकांत देशमाने, प्रताप जाधव, सुरज कापसे, माधव हंचाटे, गंगाधर चाटे,सतीश बनसोडे,प्रा खंदारे ,दिनकर काळे, ठक्कर ,कांबळे ,सुरडकर ,एकनाथ सावजी, ऍड मनोज संकाये, चंद्रकांत गीते, प्रकाश ईटके,कुंभार, पाठक, अतिरिक्त कार्यकारी अभियंता गीते इतर सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ओसाका जपान जागतिक

जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट सर्व द्वितीय रँक मयंक शैलेश चौधरीने अतिशय कठीण गणितीय प्रश्न सोडविण्याचा ऐतिहासिक विक्रम त्याने केलेला आहे. आई-वडिलांच्या आणि शिक्षकांच्या सततच्या मार्गदर्शनामुळे त्याला हे यश प्राप्त करता आलेले आहे असे त्याने सांगितले आहे. आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशनचे आयोजकने मयंक चौधरीने मिळवलेल्या यशाचे अभिनंदन उज्वल पांडा ओरिसा, जी एस एस श्रीनिवासन राव दिल्ली, राष्ट्रीय अबॅकस कार्याध्यक्ष श्री सतीश मुलगे तसेच अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ. घोडके एस ए. अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून मयंकचे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. ऑक्टोबर २०२४ ओरियंट अबॅकस इंटरनॅशनल चॅम्पियनशिप यु एस ए होणाऱ्या इंटरनॅशनल अबॅकस चॅम्पियनशिप करीता मयंक चौधरीची निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

चौकट

विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांचा विकास करण्यासाठी अबॅकस पध्दत फार उपयुक्त असून शालेय स्तरातील अभ्यासाला मुळातून मदत करण्याची, विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताबद्दलची भीती दूर करण्यासाठी अबॅकस उपयुक्त आहे असे अबॅकस मास्टर ट्रेनर एस. ए. घोडके यांनी सांगितले.

युवक युवतींनी मतदान नोंदणी करून घ्यावी -प्रा. संजय इंगोले

बीड । प्रतिनिधी

देशाचे लोकतंत्र, संविधान लोकशाही, राजकारण, समाजकारण या सर्व गोष्टी समजून न घेता आजच्या पिढीतील युवक युवती हे या गोष्टींपासून दूर जात आहेत व या गोष्टी समजून घेण्यासाठी आपल्याला देशाच्या राज्यघटनेने एक अधिकार दिला आहे. त्या अधिकाराच्या बळावर आपण एक चांगली लोकशाही तयार करू शकतो व आपले राज्य चांगल्या पद्धतीने चालवणाऱ्याच्या हातात देणे हे मतदाराचे काम आहे. पुढील काळात होणाऱ्या विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, विधानसभेच्या होणाऱ्या निवडणुकांमध्ये युवक युवतींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा यासाठी शासनाने परत एकदा नवीन मतदारांची नोंदणी सुरू केलेली आहे. तरी या नोंदणी कालावधीमध्ये युवक युवतींनी मतदार यादीमध्ये आपली नोंद करून घ्यावी. मतदान हे तुमच्या राजकीय, सामाजिक, अधिकारांसाठी एक महत्त्वाचे शस्त्र आहे. तुमच्या देशाच्या निर्णयांमध्ये भाग घेण्यासाठी

व सातत्य वाढवण्यासाठी आपली मतदानातील भागीदारी किंवा सहभाग असणे आवश्यक आहे.

फक्त सोशल मीडियामध्ये बसून देश कसा बदलेल, भ्रष्टाचार कसा कमी होईल याची चर्चा करण्यापेक्षा मतदान करून आपले अमूल्य मत चांगल्या उमेदवाराला देऊन एक नवीन बदल कसा घडून येईल हे फक्त आपल्या एका मतदानाने होऊ शकते. नवीन नोंदणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे आपल्या परिसरातील मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे किंवा ऑनलाईन संकेतस्थळावरून माहिती भरून पूर्ण करून घ्यावी. असे आवाहन ऑल इंडिया युथ फेडरेशनचे बीड जिल्हाध्यक्ष प्रा. कॉम्रेड संजय इंगोले यांनी केले आहे.

कुंडलिक खांडे, आधी माझी गाडी फोडून दाखवा! रा.काँ.चे युवा नेते अविनाश नाईकवाडे यांचे आव्हान

बीड : ताट भरून जेवायला मिळाल की सगळी पंगत आपणच दिलीये असा गोड गैरसमज कोणाचा तरी झालेला दिसत आहे. आपला खरा चेहरा जिल्ह्यातल्या लहान लेकराला पण परिचित आहे. आपले स्वतःचेच राजकीय अस्तित्व वाचवा जेणेकरून आपली लायकी किती आहे याचं आत्मचिंतन आपल्याला होईल. कुंडलिक खांडे ( ) यांनी आधी माझी गाडी फोडून घ्यायला कुठे घेऊन येऊ सांगावे, असे आव्हान रा.काँ.चे युवा नेते अविनाश नाईकवाडे ( ) यांनी दिले आहे. शिवसेनेचे () जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांची रेकॉर्डिंग व्हायरल झाली, त्यात त्यांनी भाजपच्या लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना धोका दिल्याची कबुली दिली. याच पार्श्वभूमीवर अविनाश नाईकवाडे यांनी टीकास्त्र डागले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, गेल्या ५-७ वर्षात जिल्ह्यातील सर्व पक्षातील पक्षप्रमुख म्हणून पुढे आले आहेत की आता निवडलेले जिल्ह्याप्रमुख कुठलाही जनसंपर्क नसताना, सामाजिक काम नसताना फक्त

पैशाचा माजावर जर असले पक्षाचे जिल्हाप्रमुख होत असतील, उलट वारंवार गुटखा, जुगार, दंगली, सावकारकी धंदे करणारे लोक असे लोक निवडले आहेत. दहशत माजवून आपल्या शहराची व जिल्ह्याची जी भयावह परिस्थिती झाली आहे त्यास सर्वस्वी जबाबदार हेच लोक आहेत. आणि कुंडलिक खांडे यांनी धनंजय मुंडे यांची गाडी फोडण्याची भाषा जर करत असेल तर त्याना माझ आव्हान आहे की आगोदर तुम्ही सांगा कधी, कुठे गाड्या घेऊन पोचायचे? अगोदर माझी गाडी फोडून दाखवा त्यानंतर महाराष्ट्राच्या युवकांच्या हृदयातील नेत्याकडे नजर वर करायची हिंमत करावी. मी बीड जिल्ह्यातील तमाम जनतेला आवाहन करतो की, आजच्या क्लिपमधून खांडे यांनी ओबीसी आणि मराठा दोनही समाजाचे मते मिळवण्याचा जो प्लॅन व्यक्त केला आहे, तो भयानक आहे. सर्व जातींचा सोयीने हे लोक केवळ स्वार्थासाठी वापर करतात. ज्यांच्या ताटात खातात त्यांच्याच सोबत रात्रीच्या अंधारात गद्दारी करतात. अशा लोकांना ओळखा यांना प्रतिनिधी बनायचे स्वप्न का आहेत? यांची आकांक्षा कशी आहे सगळं स्पष्ट दिसत आहे. वारंवार आपण तेच पाहिले देखील आहे अन्यथा आपल्याला व पुढच्या पिढीला याचे परिणाम भोगावे लागतील. पक्षाच्या पक्षश्रेष्ठीनी याच्या गळ्यातील पट्टा आवळावा. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती करतो की, आपल्या पक्षातील असे नासके लोक आवरा. आपण स्व.बाळासाहेब ठाकरे व स्व.आनंद दिघे साहेबांच्या विचारांचे वारस आहात, आपल्या पक्षातील असली घाण तातडीने टाका; जेणेकरून याला समजेल की सूर्यावर थुंकायचा कितीही प्रयत्न केला तरी थुंकी स्वतःवरच पडते, असेही अविनाश नाईकवाडे यांनी म्हटले आहे.

डॉ.भास्कर मोरे वर हरिण प्रकरणी गृहखात्याने कडक कारवाई करावी -राम शिंदे

जामखेड । प्रतिनिधी

आमदार राम शिंदे यांनी शनिवारी अधिवेशनात रत्नदीप मेडिकल महाविद्यालया संदर्भात सभागृहात लक्षवेधी मांडली विद्यार्थी व विद्यार्थिनींचे इतर ठिकाणी स्थलांतर करावे, हरिण प्रकरणाची चौकशी करावी ''रत्नदीप'च्या सर्व मान्यता रद्द करून शासकीय स्तरावर उच्चस्तरीय चौकशी समिती नेमावी, अशी मागणी शिंदे यांनी केली.

आमदार प्रा. शिंदे यांच्या लक्षवेधी ला उत्तर देताना जामखेड येथील रत्नदीप मेडिकल महाविद्यालय संस्थेत सात संस्था चालतात. त्यात अनियमितता दिसुन येत आहे. या संस्थेवर कारवाई करून उच्च तंत्रज्ञान विभागामार्फत चौकशी करून मान्यता रद्द करण्यात येईल. हरिण प्रकरणी जनविभाग मार्फत शासकीय

स्तरावर चौकशी समिती नेमली जाईल, असे आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

तसेच आ. मनिषा कायंदे यांनी या संस्थेला सुरुवातीला ज्या समिती सदस्यांनी मुल्याकंन करून खोटे रिपोर्ट दिले आहेत, त्यांच्या वर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. याला उत्तर देताना मंत्री मुश्रीफ म्हणाले, विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही संस्थेला ज्या अधिकारी यांनी परवानगी दिल्या आहेत, त्या कशा दिल्या याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात येईल.

रत्नदीप विरोधात आंदोलनाचा आजच्या चौथ्या दिवशी आंदोलन अधीक तीव्र होत आहे. तीन महिन्यापूर्वी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान जामखेड चे पांडूराजे भोसले यांनी तीव्र आंदोलन सुरू करून ते नऊ दिवस अमरण उपोषणास बसले होते. प्रशासनाच्या लेखी आश्वासनानुसार सर्व विद्यार्थ्यांचे तीन महिन्यात ट्रान्सफर होऊन सदरील संस्था व संस्थाचालक भास्कर मोरे यांच्या वरती कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे आश्वासित केल्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले होते, परंतु आज तीन महिने झाले तरी विद्यार्थ्यांचे ट्रान्सफर झालेले नाही व सदर संस्था व संस्था चालक भास्कर मोरे वरती विद्यापीठ व शासनाकडून कुठलीही कारवाई करण्यात आलेली नसल्याने पुन्हा पांडुराजे भोसले व सर्व विद्यार्थी दिनांक २७ जून पासून आंदोलनास बसले आहेत

काल दिनांक २९ जून आंदोलन चा तिसरा दिवस होता डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणारे रायगड या विद्यापीठामार्फत डॉ प्रदीप बोडखे व एस आर भगत यांनी विद्यापीठा मार्फत होत असलेल्या कारवाईबाबत उपोषण स्थळी येऊन अस्वस्थ केले परंतु विद्यापिठाकडून होत असलेली कारवाई समाधानकारक नसून विद्यापीठाचा वेळ काढू पणा आहे असे दिसून येत आहे जोपर्यंत विद्यार्थ्यांचे ट्रान्सफर होत नाही व आमच्या सर्व मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हे उपोषण असेच चालू राहणार आहे व यादरम्यान कोणाच्या जीवितास काही हानी झाल्यास व एकाही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्यास विद्यापीठ व प्रशासन संपूर्ण जबाबदार असणार असे मत यावेळी पांडुरंग भोसले यांनी व्यक्त केले.

आंध्र प्रदेशात आंब्यासाठी हमीभाव जाहीर

प्रतिटन ३० हजार रुपयांनी होणार आंब्याची खरेदी

हैद्राबाद : आंध्र प्रदेश सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. आंब्याची पिकासाठी हमीभाव जाहीर केला आहे. शेतकऱ्यांना प्रतिटन आंब्यासाठी ३० हजार रुपये मिळणार आहेत. आंध्र प्रदेशातील चित्तूर आणि तिरुपती जिल्ह्यांतील आंबा उत्पादक त्यांच्या उत्पादनाला वाजवी दर मिळवण्यासाठी संघर्ष करत होते. अखेर याठिकाणी तोतापुरी जातीच्या आंब्यासाठी प्रति टन ३०,००० रुपये किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली आहे. दरम्यान, आधारभूत किंमत जाहीर केल्यामुळं शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे.

तोतापुरी जातीसाठी काही व्यापारी केवळ २० हजार रुपये प्रतिटन दर देत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. ते विविध खर्चासाठी अतिरिक्त १२ टक्के कपात करत आहेत. या व्यापाऱ्यांनी मोठमोठी संकलन केंद्रे उभारून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप संबंधित शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळं अनेक ठिकाणी तक्रारी दाखल झाल्या होत्या. अशा किंमतीतील फेरफारामुळे अनेक शेतकरी गंभीर आर्थिक संकटात

सापडले आहेत. दोन्ही जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी आपल्या फळबागांमध्ये मोठी गुंतवणूक केली होती. हे शेतकरी प्रामुख्याने तोतापुरी जातीची लागवड करतात. त्यांना योग्य परताव्याची अपेक्षा होती. परंतु पीक उत्पादनात लक्षणीय घट झाली आहे. त्याचवेळी आंबा शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन चित्तूर आणि तिरुपतीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी फलोत्पादन आणि पणन अधिकाऱ्यांची बैठक घेतली, त्यानंतर त्यांनी तोतापुरी आंब्याची किमान किंमत ३०,००० रुपये प्रति टन निश्चित केली आहे. मजूर, खते आणि वाहतुकीचा खर्च लक्षात घेता प्रति टन ३०,००० रुपये किंमत चांगली असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. परंतू किंमती घसरल्यानंतर आम्हाला मोठा तोटा सहन करावा लागत होता असे शेतकरी म्हणाले.

०००

तोतापुरी आंब्याचा दर काय?

तोतापुरी जातीसाठी काही व्यापारी केवळ २० हजार रुपये प्रतिटन दर देत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. ते विविध खर्चासाठी अतिरिक्त १२ टक्के कपात करत आहेत. फलोत्पादन किंवा पणन विभाग हस्तक्षेप करत नसल्याने या व्यापाऱ्यांनी मोठी संकलन केंद्रे उभारली असून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केलाय. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे संभाव्य नुकसान आणि रोगराई पसरण्याची भीती वाढली असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

या आहेत 'सीताफळाच्या' अधिक उत्पादन देणाऱ्या जाती



सीताफळ हे उष्णकटिबंधातील सर्वांच्या आवडीचे फळ आहे. बाजारात जुलै ते ऑगस्टमध्ये येणार्या या फळांचा मुख्य हंगाम ऑक्टोबर ते डिसेंबरपर्यंत चालतो. या फळाच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती माहिती असल्यास चांगले उत्पादन घेता येते ज्यातून शेतकऱ्याला चांगला फायदा होवू शकतो. सीताफळाच्या प्रामुख्याने ४० ते ५० प्रजाती असून १२० जाती आहेत परंतु लागवडीसाठी ॲनोना स्क्वॅमोसा या प्रकारातील जाती उपलब्ध आहेत.

फुले पुरंदर : ही जात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी २०१४ मध्ये महाराष्ट्रात लागवडीसाठी शिफारस केली आहे. या जातीची फळे आकर्षक व आकाराने मोठे असून वजन ३६० ते ३८८ ग्रॅम आहे. झाडावरील फळांची संख्या ११८ ते १५४ एवढी आहे. फळातील गर घट्ट, रवाळ आणि स्वादिष्ट असून गराचे प्रमाण ४५ ते ४८% आहे. फळातील विद्राव्य घटकांचे प्रमाण २२ ते २४ टक्के आहे एवढे असते. या जातीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गरातील पाकळ्या पांढर्या शुभ्र आणि संख्येने अधिक असल्याने या जातीच्या फळांना गरासाठी मागणी आहे. फळातील बियांची संख्या ३७ ते ४० एवढी आहे. अशा विविध गुणधर्मामुळे सध्या या जातीची लागवड महाराष्ट्रात वाढत आहे.

बाळानगर : ही जात आंध्र प्रदेशातील संशोधन केंद्र येथे विकसित केलेली असून फळांचे सरासरी वजन २६६ ग्रॅम व गराचे प्रमाण ४८% आहे. प्रत्येक झाडापासून ४० ते ६० फळे मिळतात. फळातील विद्राव्य घटकांचे प्रमाण २७ टक्के असून बियांचे प्रमाण ३.९५% आहे.

अर्का सहन : ही संकरित जात भारतीय बागवानी संस्था बंगलोर, कर्नाटक येथून विकसित केलेली आहे. फळे व आकर्षक गोल, रंग फिकट हिरवा, डोळे पसरट चपटे असतात. फळाचे वजन ४०० ते ५०० ग्रॅम, गराचे प्रमाण ४८% आणि विद्राव्य घटकांचे प्रमाण ३१ टक्के असल्याने खाण्यास फारच गोड असतात. बियांची संख्या फारच कमी असून लहान असतात. फळांच्या दोन डोळ्यांमध्ये अंतर कमी असल्याने पिठ्या ढेकूण या किडीचा प्रादुर्भाव कमी आढळतो. फळे अधिक काळ टिकतात.

जनावरांतील अस्थिभंगाची कारणे अन् उपाय

हाडांमध्ये भेग किंवा मोडणे हे अस्थिभंग म्हणून ओळखले जाते. एखादा आघात किंवा ताण पडल्यामुळे हाड पूर्ण किंवा अंशतः मोडते. आघाताचे स्वरूप, दिशा, हाडाची ताण सोसण्याची क्षमता यावर अस्थिभंग अवलंबून असतो. काही विकृतींमुळे अस्थींमध्ये भंग होण्याची विशेष प्रवृत्ती आढळते. हाड हा मुळात कठीण आणि मजबूत पदार्थ आहे. वय, आजार आणि पोषणातील चुन्याच्या अभावामुळे हाड नाजूक आणि ठिसूळ होऊन मोडते. अपघातामध्ये हाडे मोडण्याचा संभव असतो. जनावरांमध्ये पायाचा अस्थिभंग जास्त प्रमाणात दिसतो. जनावरांमध्ये मेटाकार्पस (समोरील पायांतील हाडे), मेटाटारसच्या टिबिया (मागच्या पायांतील हाडे), रेडिअस आणि अल्ना (समोरील पायांतील हाडे) आणि ह्यूमेरसच्या कोपराचे हाड मोडण्याची शक्यता जास्त असते. फरा, मांडी आणि कंबरेचे हाडदेखील बऱ्याच वेळा मोडलेले दिसते. जबडा, पाठीचा कणा, छातीच्या बरगडीच्या हाडांचे मोडणे दिसून येत नाही. लहान वासरू, कोकराची हाडे लवचिक असतात. त्यामुळे ती पूर्ण न मोडता फांदीप्रमाणे केवळ एक बाजूला मोडतात. पूर्ण ताटातूट न झाल्यामुळे तुकडे एकमेकांबरोबर राहतात. असा अस्थिभंग केवळ क्ष-किरणांनी दिसतो. योग्य उपचारामध्ये लवकर जुळून येतो. मोठ्या जनावरांमध्ये हाडे कडक असतात. वाळलेल्या काठीप्रमाणे कडकन तुकडे होतात. काही वेळा त्वचेला जखम न होता



अस्थिभंग आतल्या आत राहतो. हाड मोडून वरची त्वचा, मऊ भागांना जखम होते अशा अस्थिभंगास अवघड अस्थिभंग म्हणतात. जखमेत जंतूंचा प्रादुर्भाव होऊन पू, सूज, ताप, जखम मोठी होणे, या समस्या दिसतात.

हाड मोडण्याचे प्रकार : स्थिर अस्थिभंग - हाडाचा कोपरा मोडतो. भेगाळलेला अस्थिभंग - हाडाला आडवी भेग पडते. कमकुवत अस्थिभंग - हाडांचे एकापेक्षा जास्त तुकडे होतात.

अस्थिभंगाची लक्षणे : जनावरांच्या अस्थिभंगाची सर्वसाधारण लक्षणे माणसाप्रमाणेच असतात. श्रोणीफलकाचा अस्थिभंग झाल्यास मोडलेल्या हाडावर भार देऊन जनावर उभे राहू शकत नाही. चेहऱ्याच्या हाडांपैकी कोणत्याही हाडाचा भंग झाला तर अन्न चावणे किंवा रवंथ करणे शक्य होत नाही. लाळ सारखी गळत राहते. दात तुटतात. मणक्याचा अस्थिभंग घोडा आणि श्वानामध्ये अधिक प्रमाणात दिसतो. फऱ्याच्या हाडाजवळ जाड स्नायूंमुळे मोडलेल्या हाडाचे तुकडे एकमेकांपासून फार दूर जात नाहीत, त्यामुळे अस्थिभंग लवकर बरा होतो.

उपचार : पशुवैद्यकाच्या सल्ल्याने आवश्यक क्ष- किरण चाचणीनंतर उपचार करावा. : लहान जनावरांत लांब हाडांच्या पोकळीत जंतुहीन सळई घालून हाड हलू नयेत असा प्रयत्न करतात. विविध उपकरणांचा उपयोग करून हाडे स्थिर ठेवण्यात येतात. हाडांमधील मज्जेमध्ये (लांब हाडांच्या पोकळ भागात आढळणाऱ्या मऊ पदार्थात) खिळ्यासारख्या धातूचा तुकडा घालून हाडे जोडतात. हाड मोडलेल्या ठिकाणी शक्य असल्यास लाकडी फळीचा आधार देऊन बांधावे. अस्थिभंगावर उपचार केल्यानंतरही क्ष किरण चित्र काढून हाड नीट बसले आहे का हे तपासावे. जनावरास योग्य वेदनाशामक गोळ्या नियमित द्याव्यात. कॅल्शिअम, फॉस्फरस आणि जीवनसत्त्व ड युक्त टॉनिक नियमितपणे द्यावे.

आले (अद्रक) लागवड तंत्रज्ञान

आले या वनस्पतीची लागवड पौराणिक काळापासून केली जाते. आल्यातील विशिष्ट चव व स्वाद यामुळे दररोजच्या जेवणातील मसाल्यात आल्याचे महत्वाचे स्थान आहे. ओले आले, प्रक्रिया करून टिकवलेले आले अथवा सुंठ अशा स्वरुपात आल्याचा उपयोग करतात. जमिनीतील आल्याच्या खोडाचा उपयोग मसाल्यासाठी करतात.

हवामान व जमीन : आल्याला उष्ण व दमट हवामान मानवते. थंडीमुळे आल्याची पानेवाढ थांबते व जमिनीत खोडाची वाढ सुरु होते. मात्र शेतकऱ्यांच्या अनुभवावरून असेही लक्षात आले की, साताऱ्यापासून मराठवाड्यापर्यंत पीक येऊ शकते. समुद्रकिनाऱ्याच्या भागात जेथे २०० से. मी. किंवा थोडा जास्तच पाऊस पडतो तेथे पावसाळी पाण्यावर आले घेतले जाते. समुद्रसपाटी पासून १०० ते १५०० मीटर उंचीपर्यंतच्या प्रदेशात आल्याची लागवड करण्यात येते. आल्यासाठी मध्यम खोलीची उत्तम निचरा असलेली कसदार जमीन उत्तम असते. नदीकाठच्या पोयटाच्या गाळ मिश्रित जमिनीत आले उत्तम येते. जमिनीवर पाणी तुंबून राहिलेले ह्या पिकास नुकसानकारक असते. तसेच जमिनीत विम्लतेचे प्रमाण जास्त नसावे. एकाच जमिनीत मात्र वरचेवर आले घेऊ नये कारण त्यावर येणाऱ्या मर रोगाचे नियंत्रण अवघड जाते.

पूर्वमशागत : आल्याचे गड्डे जमिनीत वाढत असल्यामुळे सखोल पूर्वमशागत करणे गरजेचे असते. जमीन लोखंडी नांगराने ३०-४० से. मी. खोल उभी आडवी नांगरून घ्यावी. ३ ४ कुळवाच्या पाळ्या देऊन माती भूशभुशीत करून घ्यावी. या पिकाच्या लागवडीसाठी जमिनीची

आखणी निरनिराळ्या पद्धतीने केली जाते. हलक्या जमिनीत सपाट वाफे पध्दत, मध्यम व भारी जमिनीत सऱ्यावरंबे पध्दत वापरतात. जमिनीत हेक्टरी ४० गाड्यापर्यंत (२० टन) शेणखत टाकावे.

बियाण्याची निवड, लागवडीची वेळ व लागवड : महाराष्ट्र माहीम या स्थानिक जातीची लागवड करतात. या जातीमध्ये मोक्या व आंगऱ्या असे दोन प्रकार आढळतात. चांगल्या प्रतीचे निरोगी ३-५ से. मी. लांबी व अंदाजे २०-२५ ग्रॅम वजनाचे आणि २-३ कोंब रुजण्याइतपत डोळे असलेले बेणे निवडावे. एक हेक्टर लागवडीस साधारणपणे १४०० ते २००० किलो बेणे लागते. सध्या वाफ्यात आल्याची लागण २५ २२.५ से. मी. अंतरावर करतात. बेने ४-५ से. मी. खोल लावून मातीने झाकावे. लागण कोरडीत करून हलके पाणी सोडून वाफे भिजवतात. गड्डा लावताना कोबांची टोके जमिनीच्या वरच्या बाजूस येतील अशी काळजी घेऊन लागण करावी.

आले कीड : रोगाला नाजूक असल्याने कंद लागवडीच्या वेळी प्रतिबंधक उपाय म्हणून डायथेन-झेड-७८ आणि नुवाक्रॉन अनुक्रमे २५० ग्रॅम आणि १०० मि. ली. , १०० लीटर पाण्याच्या मिश्रणात बुडवून लावावेत.

आंतरमशागत : लागवडीनंतर १५ ते २० दिवसात कोंब जमिनीच्या वर दिसू लागतात. त्यानंतर लगेच कोंबाना धक्का न लागेल अशी काळजी घेऊन वाफ्यातील तण काढून घ्यावेत. वेळोवेळी हात खुरपणी करून तण काढावे. पीक १२० दिवसाचे झाल्यावर हलकी खोदणी करून दुसरा वरखताचा हप्ता द्यावा. त्यामुळे गड्ड्याची नीट वाढ होण्यास मदत होते.

व्यवस्थापन : लागण होताच एक हलके पाणी द्यावे. पाऊसमान लक्षात घेऊन दर ६ ते ८ दिवसांनी पिकास पाणी द्यावे. पिकात पाणी साचून राहू नये याची काळजी घेणे फार महत्वाचे आहे.

वरखते : लावणीच्या वेळी १०० किलो अमोनिअम सल्फेट, ३०० किलो सुपर फॉस्फेट व ८० किलो म्युरेट ऑफ पोटॅश वाफ्यात टाकावे व त्यानंतर ६ ते ८ आठवड्याने ५० किलो व १२० दिवसांनी १०० किलो युरिया द्यावा.

काढणी व उत्पादन : आल्याचे पिक ७ महिन्यात तयार होते. मात्र आले सुंठीकरता लावले असल्यास ८.५ ते ९ महिन्यात पीक तयार होते. जानेवारी महिन्यात पाने पिवळी पडून वाळू लागतात. वाळलेला पाला कापून पाला पाचोळा वेचून घ्यावा. कुदळीने खोदून आल्याच्या गड्डयांची काढणी करतात. खणताना गड्ड्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. आले वेचून पाण्याने स्वच्छ धुवून गड्डे व बोटे (नवीन आले) वेगवेगळी करावी. हेक्टरी उत्पादन १०-१५ टनापर्यंत येऊ शकते.

कीड व रोग : खोडमाशी, कंदमाशी, उन्नी (हुमणी), नरम कूज

उपाय : रोगट झाडे समूळ उपटून नष्ट करावी. लावणीपूर्वी व नंतर दर महिन्यास जमिनीवर व पिकावर ५:५:५० चे बोर्डोमिश्रण फवारावे. पिकाचा फेरपालट, उत्तम निचरा होणार्या जमिनीत लागवड अत्यावश्यक.

महत्वाच्या घटना

१६९३ : संभाजीराजांच्या मृत्यूनंतर मोगलांकडे गेलेला सिंहगड नवजी बलकवडे यांनी पुन्हा स्वराज्यात आणला.
१८७४ : टंकलेखक (टाईपरायटर) पहिले व्यावसायिक टंकलेखन यंत्र (टाइपराइटर) ची विक्री सुरु झाली.
१८७९ : भारतात पोस्टकार्ड बाजारात विक्रीस उपलब्ध झाली.
१९०९ : क्रांतिकारक मदनलाल धिंग्राने भारतमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली यांची इंपिरिअल इन्स्टिट्युटच्या 'जहांगिर हाऊस'मधे इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी गोळ्या झाडून हत्या केली.
१९१९ : कै. बाबूराव ठाकूर यांच्या 'तरुण भारत' (बेळगाव) या वृत्तपत्राची सुरूवात झाली.
१९३३ : नाट्यमन्वंतर संस्थेच्या 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९३४ : मानवी शरीराचे सर्वप्रथम छायाचित्र घेण्यात अमेरिकन डॉक्टरांना यश
१९४८ : बाजारपेठेतील व्यापार्यांचे नेतृत्त्व करणार्या 'पूना मर्चंट्स चेंबर' या संस्थेची स्थापना
१९४८ : 'कायदेआझम' मुहम्मद अली जीना यांच्या हस्ते 'स्टेट बँक ऑफ पाकिस्तान' या पाकिस्तानच्या मध्यवर्ती बँकेचे उद्घाटन झाले.
१९४९ : त्रावणकोर व कोचीन ही दोन संस्थाने एकत्र करुन 'थिरुकोची' संस्थान निर्माण करण्यात आले. याचेच पुढे केरळ राज्य बनले.
१९५५ : 'स्टेट बँक ऑफ इंडिया ॲक्ट १९५५' अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया अस्तित्त्वात आली. याआधी ही बँक इंपिरिअल बँक या नावाने ओळखली जात होती.
१९६० : रवांडा व बुरुंडी हे देश स्वतंत्र झाले.
१९६१ : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार पुणे विद्यापीठाचे चौथे कुलगुरू झाले.
१९६२: सोमालिया व घाना हे देश स्वतंत्र झाले.
१९६४ : न. वि. गाडगीळ पुणे विद्यापीठाचे पाचवे कुलगुरू झाले.
१९६४ : भारतीय औद्योगिक विकास बँकेची स्थापना
१९७५ : भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २० सूत्री कार्यक्रमाची घोषणा केली.
१९९७ : शतकातील सर्वोत्कृष्ट वेटलिफ्टर्सच्या यादीत भारताच्या कुंजरानी देवीचा समावेश करण्यात आला.
२००२ : आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायालय स्थापना झाली.
२०१५ : डिजिटल इंडिया या प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.
२०१७ : देशांतील अर्थव्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण सुधारणा म्हणून वस्तू व सेवाकर (जीएसटी) संपूर्ण भारतात लागू करण्यात आला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४६ : प्रख्यात जर्मन गणितज्ञ व तर्कशास्त्र विद्वान गाटफ्रीड विलहेल्म लाइबनिज( ) यांचा जन्मदिन.
१८८२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (मृत्यू: १ जुलै १९६२ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१८८७ : कविवर्य एकनाथ पांडुरंग रेंदाळकर (मृत्यू: ? ? १९२०)
१९१३ : वसंतराव जाईक महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री, रोजगार हमी योजनेचे जनक (मृत्यू: १८ ऑगस्ट १९७९)
१९३८ : प्रख्यात भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत परंपरेतील महान बासुरी वादक, संगीत दिग्दर्शक आणि थोर शास्त्रीय कलाकार पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचा जन्मदिन.
१९४९ : वेंकय्या नायडू केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष, भारताचे वे१३ उपराष्ट्रपती
१९६१ : कल्पना चावला भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर (मृत्यू: १ फेब्रुवारी २००३)
१९६६ : उस्ताद राशिद खान रामपूर-साहसवान घराण्याचे शास्त्रीय गायक
१९६८ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध हिंदुस्थानी संगीत परंपरेतील रामपूर-साहसवान घराण्यातील शास्त्रीय संगीतकार उस्ताद रशीद खान यांचा जन्मदिन.
१९७३ : साली प्रसिद्ध भारतीय राजकारणी व समाजवादी पक्षाचे अध्यक्ष तसचं, उत्तरप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री अखिलेश कुमार यादव यांचा जन्मदिन.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६० : चार्ल्स गुडईयर रबरावरील व्हल्कनायझेशन ही प्रक्रिया शोधणारे अमेरिकन संशोधक (जन्म: २९ डिसेंबर १८००)
१९३८ : गणेश श्रीकृष्ण तथा 'दादासाहेब' खापर्डे प्रख्यात कायदेपंडित, विद्वान आणि राजकीय नेते, लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, 'वर्हाडचे नबाब' (जन्म: २७ ऑगस्ट १८५४)
१९४१ : सर सी. वाय. चिंतामणी स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रागतिक पक्षाचे नेते व श्रेष्ठ वृत्तपत्रकार, पहिल्या गोलमेज परिषदेचे विशेष अतिथी, उत्तरप्रदेशचे शिक्षणमंत्री (जन्म: १० एप्रिल १८८० विजयनगरम, आंध्र प्रदेश)
१९६२ : पुरुषोत्तम दास टंडन स्वातंत्र्यसेनानी, भारतरत्न (१९६१), राष्ट्रभाषा हिन्दीचे समर्थक, अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष (जन्म: १ ऑगस्ट १८८२)
१९६२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (जन्म: १ जुलै १८८२ पाटणा, बिहार)
१९६९ : मुरलीधरबुवा निजामपूरकर कीर्तनकार
१९७१ : सर विल्यम लॉरेन्स ब्रॅग (ऑस्ट्रेलियन-ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता,)
१९८९ : प्राचार्य ग. ह. पाटील कवी व शिक्षणतज्ञ, 'माझ्या मामाची रंगीत गाडी हो', 'देवा तुझे किती, सुंदर आकाश', 'डराव डराव, डराव डराव, का ओरडता उगाच राव' अशी त्यांची अनेक बालगीते लोकप्रिय आहेत. (जन्म:)
१९९४ : राजाभाऊ नातू दिग्दर्शक, नेपथ्यकार, प्रकाशयोजक व नाट्य संघटक (जन्म:)
१९९९ : एम अँड एम चे संस्थापक फॉरेस्ट मार्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १९०४)

शिक्षकांच्या सेवेचा गौरव करणे ही भा.शि.प्र. संस्थेची परपरा-डॉ.आलूरकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

''अनेक वर्ष अत्यंत प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या सेवेचा गौरव करणे ही भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेची परंपरा आहे,'' असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्रजी आलूरकर यांनी केले. ते प्रा.संजय धांडे यांच्या सेवा गौरव सोहळ्यामध्ये अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. याप्रसंगी मंचावर सेवा गौरव मूर्ती प्रा. संजय धांडे, सौ. वैशाली धांडे ,भा.शि.प्र. संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष श्री.राम कुलकर्णी, केंद्रीय कार्यकारिणी सदस्या डॉ.सौ. कल्पनाताई चौसाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी ,दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड. मकरंद पत्की आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

खोलेश्वर महाविद्यालयातील व्यवसाय शिक्षण विभागातील बँकिंग फायनान्शियल सर्व्हिसेस अँड फायनान्स या विभागातील पूर्ण वेळ शिक्षक प्रा. संजय पुरण धांडे हे नियत वयोमानानुसार दिनांक ३० जून २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत त्यानिमित्ताने खोलेश्वर महाविद्यालयात त्यांचा सेवा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रतिमापूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या वतीने श्री. व सौ. धांडे यांचा सन्मानचिन्ह, साडी -चोळीचा संपूर्ण आहेर व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना डॉ.आलूरकर म्हणाले की आपण जेथे काम करतो त्या घटकाला आपला परिवार मानने ही खूप मोठी बाब आहे. यापेक्षा दुसरी कोणती मोठी कृतार्थता नाही. ही भावना त्या व्यक्तीच्या मनात निर्माण होण्यासाठी तुम्ही सहकारीच त्याला कारणीभूत असता.हा कृतार्थ भाव प्रा. धांडे सरांनी जपला आहे, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या व शिक्षक कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त प्रा. नितीन केंद्रे यांचेही त्यांनी यावेळी अभिनंदन केले. आपल्या भावना व्यक्त करताना सेवा गौरव मूर्ती प्रा. संजय धांडे म्हणाले की केवळ मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात शैक्षणिक क्षेत्रात आपल्या गुणवत्तेचा एक वेगळा ठसा उमटविणाऱ्या व अग्रेसर असणाऱ्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेत मला नोकरी करण्याची संधी मिळाली ही माझ्यासाठी खूप मोठी भाग्याची गोष्ट आहे. आज संस्था वर्धापन दिनी माझा सेवा गौरव होत आहे ही माझ्यासाठी खूप आनंदाची बाब आहे. या संस्थेत प्रारंभी स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड येथे व नंतर खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे काम करत असतानाच अनेक गोष्टी मला शिकता आल्या व त्यातूनच मी घडत गेलो. म्हणून स्वा.सावरकर परिवार व खोलेश्वर परिवार हे दोन्ही परिवार माझ्यासाठी सदैव प्रेरणास्त्रोत राहिले आहेत. ज्या गुरुजनांनी मला येथे काम करण्याची प्रेरणा दिली त्यांचे मी आभार मानतो अशा भावना व्यक्त करून आपल्या सेवा काळातील अनेक गोष्टींना त्यांनी यावेळी उजाळा दिला. मला या महाविद्यालयात सेवा करण्याची संधी संस्थेने दिली त्याबद्दल मी संस्थेचा ऋणी आहे असे भावोद्गार त्यांनी यावेळी काढले. राम कुलकर्णी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की या संस्थेत नोकरी करण्याची संधी एखाद्या शिक्षक कार्यकर्त्याला मिळणे ही त्याच्यासाठी आनंदाची व भाग्याची गोष्ट असते. प्रा.धांडे यांच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केले. ते म्हणाले की एखाद्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचा उचित गौरव करण्यासाठीच अशा प्रकारच्या सेवा गौरव कार्यक्रमाचे आयोजन केले जाते असे सांगून त्यांनी प्रा. संजय धांडे यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच भा.शि.प्र. संस्थेच्या ७३ व्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी आज महाविद्यालयात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली, ज्यात महाविद्यालय परिसरात हॉर्टिकल्चर विभाग व एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम, पाचव्या डिजिटल वर्ग खोलीचे उद्घाटन, नूतन इमारत वीट बांधकामाचा शुभारंभ व छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध उद्योजक श्री. विवेक देशपांडे (रुद्रानी कन्स्ट्रक्शन) यांनी महाविद्यालयास दिलेल्या जलशुद्धीकरण यंत्राचे उद्घाटन आदी बाबींचा समावेश होता. यावेळी डॉ.सौ. कल्पनाताई चौसाळकर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या की आजच्या दिवसाची सुरुवात व शेवट हा भारावलेल्या वातावरणात होत आहे. आज असलेल्या संस्था वर्धापन दिनानिमित्त तसेच प्रा. संजय धांडे यांच्या सेवापूर्ती बद्दल त्यांनी शुभेच्छा दिल्या. या यावेळी प्रा.विनय राजगुरू,प्रा. डॉ. दिगंबर मुडेगावकर,प्रा. डॉ. बिभिषण फड, कु. साक्षी धांडे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी सीबीएसई इंग्लिश स्कूलचे प्रमुख प्रा. डॉ. गोपाळ चौसाळकर, डॉ. प्रवीण जोशी, प्रा. एस. पी. कुलकर्णी, ॲड. मकरंद पत्की, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. रवींद्र कुंबेफळकर, प्रा. धांडे यांचे सर्व कुटुंबीय, नातेवाईक, मित्र, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जीजाराम कावळे यांनी केले तर आभार प्रा. डॉ.अजय डूबे यांनी मानले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

शहर पोलिसांचा बिंगो चक्रीवर छापा

२८ हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

चक्री नावाच्या जुगाराचे चक्र थांबवण्याचा पोलिसांच्या डीबी पथकाने वेळा उचलला असून बीड बस स्थानकासमोरील चक्री व छापा मारून साहित्य जप्त केले आहे चक्री बिंगो नावाच्या जुगाराचे बीड शहरातील गल्लीत मुळात अड्डे सुरू झाले आहेत या ऑनलाइन चक्री बिंगोमुळे अनेकांचे संसार उध्वस्त होऊ लागले आहे बीड शहर शिवाजीनगर आणि पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत अशा प्रकारच्या चक्री जुगारावर धंदा सर्रासपणे सुरू आहे गेल्या काही दिवसापासून मात्र सर्वच पोलीस ठाणे प्रमुखांनी या चक्री बिंगो विरोधात

कारवाईची हत्यार उपसले असून एका मागोमाग एक चक्री बिंगोवर छापे मारण्याचे सत्र सुरू केले आहे अशाच प्रकारे बीड बस स्थानकासारख्या गजबजलेल्या हद्दीत सुरू असलेल्या या चक्रीभिंगो जुगारावर डीबी पथकाने छापा मारला या छाप्यात पोलिसांनी सीपीयू मॉनिटर कीबोर्ड माऊस आणि ४७० रुपयांची रोग असा एकूण २८ हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणात पोलीस शिपाई सुसेन वंचित पवार यांच्या फिर्यादीवरून शेख आयुब शब्बीर यांचे विरुद्ध शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदरील कामगिरी बीड शहर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बाळासाहेब शिरसाठ जयसिंग वायकर मनोज परजणे अशपाक सय्यद सुशील पवार यांनी केली पुढील तपास हेड कॉन्स्टेबल माने करीत आहे.

बीड : शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कपप्रमुख किशोरजी पोतदार साहेब बीड मध्ये आले असता शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,आष्टी चे तालुका प्रमुख सुभाष राऊत,शिरूर चे तालुका प्रमुख सोपान काका मोरे,पाटोदा चे तालुका प्रमुख मुकुंद शिंदे,रवी आण्णा वाघमारे, आष्टी चे उपतालुकाप्रमुख संदीप हाडे,गटप्रमुख सोमनाथ खिळे मेजर,दीपक घोडके उपस्तिथ होते.

रोटरीअध्यक्षपदी पांडुरंग चांडक तर सचिव पदी प्रभाकर शेटे

माजलगाव (प्रतिनिधी) रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रलच्या २०२४-२५ या रोटरी नूतन वर्षासाठी शहरातील प्रतिष्टीत व्यापारी रो.पांडुरंग चांडक यांची अध्यक्षपदी तर सामाजिक कार्यकर्ते रो.प्रभाकर शेटे यांची सचिव पदावर एकमताने निवड झाली.त्याच बरोबर रोटरी क्लबच्या इतर विषय समित्यावर अनेक रोटरीयनच्या नियुक्त्या पार पडल्या.जगातील अग्रगण्य सामाजिक संस्था असलेली रोटरी इंटरनॅशनलचाच एक भाग असलेल्या रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रलची २०१६ मध्ये शहरात स्थापना झाली होती.तेव्हा पासून रोटरी माजलगाव सेंट्रल हा क्लब शहर व तालुक्यात आरोग्य, पर्यावरण,शैक्षणिक सामाजिक कार्यात पुढाकार घेत आहे.

दि ३० जून रविवार रोजी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे उप प्रांतपाल रो.डॉ.शंकर जुगगर यांचे उपस्थितीत २०२३-२४ अध्यक्ष रो.इम्रान नाईक व सचिव रो.सुनील शिंदे यांचेकडून नूतन पदाधिकाऱ्यांनी रीतसर पदभार स्वीकारला यावेळी रोटरी क्लबच्या खालील विषय समित्यावर निवडी पार पडल्या यात व्हॉइस प्रेसिडेंट डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले,ट्रेझरर डॉ.सुनील गरड, जॉईंट सेक्रेटरी रो. विनोद जाधव, क्लब ऍडमीस्ट्रेटर डॉ.यशवंत राजेभोसले, डॉ.क्लब ट्रेनर प्रा. नीलकंठ साबळे,पब्लिक इमेज रो.अंकुश राठोड,इंटरनॅशनल सर्व्हिस इंजि.कृष्णा सोळंके,मेडिकल डायरेक्टर डॉ.शिवाजीराव काकडे,मेम्बरशिप डेव्हलपमेंट इंजि.गजेंद्र खोत, युथ सर्व्हिस रो.सुनील शिंदे, पर्यावरण समिती रो.सुदर्शन थावरे सह रो.नारायण गंडे रो.उमाकांत सोळंके रो.अंकुश डाके रो.रणजित राठोड रो.विनायक कदम रो.हनुमान कासट रो.डॉ.एम.ए.कव्हाळे रो.परमेश्वर शिंदे रो.समीर शेख रो.निलेश काटकर इत्यादींच्या सन २०२४-२५ साठी विविध समित्यावर निवडी झाल्या.

रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलचे स्थापने नंतर मागील कार्यकाळात क्लबने अंधत्व निर्मूलन मोहिमेत मोतीबिंदू नेत्र शस्त्रक्रिया शिबीर, हृदयरोग,मधुमेह, कॅन्सर उपचार मार्गदर्शन शिबीर,गुडघे दुखी सांधे दुखी उपचार शिबीर त्याच बरोबर तालुक्यात वॉटरकप कार्यक्रमात सहभागी होऊन शहरांत सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व वृक्ष संगोपन यशस्वी केले आहे. शैक्षणिक कार्यामध्ये गरीब होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप व एकल महिलाना छोट्या पीठाच्या गिरण्या वाटप असे अनेक सामाजिक उपक्रम घेतले आहेत.येत्या काळात मागील वर्षाची उन्हाची दाहकता लक्षात घेऊन शहरातील विविध सामाजिक संघटना,व्यापारी महासंघ,पत्रकार संघ व शासकीय निमशासकीय यंत्रणाच्या सहभागाने रोटरी क्लब सेंट्रल मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण मोहीमे बरोबरच रेन हार्वेस्टिंग जल जागृती मोहीम राबवणार आहे पर्यावरण संतुलनाच्या मोहिमेत सहभाग महत्वाचा ठरणार आहे

-रो.पांडुरंग चांडक

(नुतन अध्यक्ष माजलगाव रोटरी सेंट्रल)

उर्दू माध्यमांच्या उमेदवारांची शिक्षक भरती करावी

शिक्षण विभाग व शिक्षण अधिकारी यांचे दुर्लक्ष; खा. सोनवणे यांनी लक्ष घालण्याची गरज

बीड । प्रतिनिधी

शिक्षक अभियोगिता व बुद्धिमत्ता चाचणी २०२२ पवित्र प्रणाली अंतर्गत बीड जिल्हा परिषद मध्ये निवड यादीतील उर्दू माध्यमांच्या २३ उमेदवारांना अद्याप पर्यंत पदस्थापना देण्यात आलेली नाही. संपूर्ण महाराष्ट्रात पवित्र पोर्टल अंतर्गत पहिली व दुसरी यादी प्रसिद्ध करण्यात आली. तसेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पहिली व दुसरी यादीतील सर्व उमेदवारांची समुपदेशनाद्वारे पदस्थापना देण्यात आले आहे.परंतु महाराष्ट्रातील एकमेव बीड जिल्ह्यात अद्यापपर्यंत पहिलीच यादीतील उमेदवारांना पदस्थापना दिलेली नाही.

या संपूर्ण प्रकरणाकडे शिक्षण विभाग व विशेष करून शिक्षण अधिकारी यांचे दुर्लक्ष असून असा भोंगळ कारभार महाराष्ट्रातील पहिलाच बीड जिल्ह्यामध्ये होताना दिसत आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये भरती होऊन उमेदवारांचे वेतन सुद्धा सुरू झाले परंतु आपल्या जिल्ह्यामध्ये पहिलीच यादीतील उमेदवारांना पदस्थापना न देता शिक्षण विभाग भोंगळ कारभार करून विद्यार्थ्यावर अन्याय तर करत नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. निवड झालेले उमेदवार व पालक शिक्षण विभागात चकरा मारून पदस्थापना मिळण्याबाबत विनंती करत आहेत परंतु शिक्षणाधिकारी व शिक्षण विभाग गप मुग गिळून बसले आहे. शिक्षण विभागाने उर्दू माध्यमाच्या निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना द्यावी नसतात सर्व उमेदवार न्यायालयीन लढाई लढण्याच्या तयारीत असून लवकरच ते न्यायालयात याबाबतीत याचिका दाखल करणार आहे. खा. बजरंग सोनवणे यांनी उर्दू माध्यमातील शिक्षक भरती प्रकरणी लक्ष घालून शिक्षण विभागाला तात्काळ सूचना करून निवड झालेल्या य उमेदवारांना पदस्थापना द्यावी.

छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात ऑल इंडिया फोरम माजलगाव युनिटच्या वतीने शनिवारी दि.२९ जुन रोजी ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मौलाना निसार होते.यावेळी शेख बासेत,उमर फारूक,मौलाना माजिद,हाफिज बशीर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना उमर फारुख म्हणाले की, ऑल इंडिया फोरम संघटना मानवतेसाठी काम करते.शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रात देखील या संघटनेचे काम आहे.यावेळी बोलताना मौलाना माजिद म्हणाले की, या संघटनेचे देशभर ३०० युनिट कार्यरत आहेत.मानवता हाच या संघटनेचा प्रमुख उद्देश आहे. यानंतर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालासाहेब झोडगे यांनी केले.यावेळी आप्पासाहेब होके, माधव घोलप,विष्णू गडकर,मुरलीधर भालशंकर,दत्ता इंगळे,अनंत शेजुळ, सय्यद गयास, अनंत राठोड, सत्यप्रिया होके पाटील,पंकज कळसकर, तुळशीराम साळवे, शेख शहाणूर, ज्ञानेश्वर पवार, फरजाना पठाण, स्मिता डाके,मिलिंद देशपांडे,दत्ता पांडे, दिनकर काळे यांची उपस्थिती होती.

तंत्रशिक्षणात योगेश्वरी महाराष्ट्रात अग्रेसर

योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांचे उन्हाळी परीक्षेत घवघवीत यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अभियांत्रिकी पदविका उन्हाळी सत्र परीक्षा-२०२४ निकालामध्ये येथील कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.स्वातंत्र्यपूर्व काळापासून अंबाजोगाई येथे शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांनी संस्थेचे नाव महाराष्ट्रात उज्वल केले आहे. यामध्ये तृतीय वर्षात ९०% पेक्षा अधिक गुण घेऊन विद्यार्थ्यांनी नामवंत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात थेट द्वितीय वर्षास आपला प्रवेश निश्चित केला आहे.

> ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने तंत्रशिक्षीत होऊन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे नाव महाराष्ट्रात उज्वल करत असून, मी सर्व संचालकांच्या वतीने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व तंत्रनिकेतनच्या शिक्षक वर्गाचे अभिनंदन करतो.
>
> चंद्रशेखर बर्दापूरकर
> अध्यक्ष यो.शि.संस्था अंबाजोगाई

यामध्ये प्रथम वर्ष संगणक अभियांत्रिकी पदविका वर्गातून सूर्यवंशी श्रुतिका (९४.८२%), प्रथम, तिडके विशाखा (९३.४१%) द्वितीय, तिवारी प्रबल (९२.९४%) तृतीय. द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकी पदविका वर्गातून देशमुख स्नेहा (८९.८७%) प्रथम, लांडगे अनिश्का(८९.०७%) द्वितीय, जाधव चैतन्य (८५.२०%) तृतीय. तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी विभागातून पेटेवार आदित्य (९१.३१%) प्रथम, तिडके रोहन (८८.३५%) द्वितीय, फड माणिक (८८.२४%) तृतीय प्रथम वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी पदविका वर्गातून मुळे अंकिता (९०.८९%) प्रथम, सस्ते तेजस्विनी (८७.२२%) द्वितीय, पवार सुस्मिता (८५.३३%), तृतीय, द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी पदविका वर्गातून भांगे ज्ञानेश्वर (८४.५०%). प्रथम, मुंडे नागनाथ (७९.६३%) द्वितीय, लांडगे अपेक्षा (७८.५०%) तृतीय. तृतीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी वर्गातून नाईकवाडे प्रतीक्षा (९१.३३%) प्रथम, बनाळे सुदर्शन (८९.२२%) द्वितीय, फिसरेकर श्रेयश (८८.८९%) तृतीय. प्रथम वर्ष यंत्र अभियांत्रिकी वर्गातून राऊत रोहिणी (८८.४४%) प्रथम, चौघुले निलेश (८६.२२%) द्वितीय, हारे अश्विनी (८४%) तृतीय, द्वितीय वर्ष यंत्र अभियांत्रिकी पदविका वर्गातून, पवार निकिता (८३.५०%) प्रथम, हाके अहिल्या (८३%) द्वितीय, कत्राळे शुभांगी (८०.६३%) तृतीय, तृतीय वर्ष यंत्र अभियांत्रिकी वर्गातून मगर अनिकेत (९४.५२%) प्रथम, सटाले पवन (९३.८९%) द्वितीय, मस्के वीरेंद्र (९०.४४%) तृतीय. प्रथम वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी वर्गातून जाधव पल्लवी (८३.२२%) प्रथम, सरवदे साक्षी (८२.२२%) द्वितीय व वेदपाठक पार्थ (७९.६७)%) तृतीय., द्वितीय वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी वर्गातून बिराजदार अभिषेक (८४.४७%) प्रथम, दळवे परमेश्वर (८४.००%) द्वितीय, शेटे ऋतुराज (७४.९४%) तृतीय, तृतीय वर्ष स्वयंचलित अभियांत्रिकी वर्गातून भांगे प्रथमेश (७९.११%) प्रथम, शेळके अश्वमेध (७६.४४%) द्वितीय क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. कु.विशाखा तिडके व चि.प्रबल तिवारी यांनी गणित विषयात तर कु.अश्विनी हारे व कु.रोहिणी राऊत या विद्यार्थ्यांनी इंजिनिअरींग मेक्यानिक्स विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून महाराष्ट्रात सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. या विद्यार्थ्यांना गणित विषयासाठी प्रा.नारायण सिरसाट व मेक्यानिक्स विषयासाठी प्रा.श्याम गडदे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशामागे विभागप्रमुख प्रा. रोहित कदम, प्रा.नारायण सिरसाट, प्रा.अतुल फड, प्रा.श्याम गडदे प्रा. बप्पासाहेब सोनवणे व सर्व शिक्षकीय कर्मचा-यांनी मेहनत घेतली. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष श्री .गणपत व्यास, का. उपाध्यक्ष ॲड. जगदीश चौसाळकर, सचिव कमलाकरराव चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ. शैलेश वैद्य, संचालक श्री.प्रताप पवार यांनी अभिनंदन केले आहे. अशी माहिती कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे यांनी दिली.

गोटेगाव येथे संत गजानन महाराजांच्या पालखीचे चार जूलैला आगमन

केज/प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत असलेले संत श्री गजानन महाराज शेगाव यांच्या पालखीचे गोटेगाव ता. केज येथे चार जुलै रोजी दुपारी आगमन होत असून श्री च्या पालखीचे दर्शन व सोहळा पाहण्यासाठी भाविक भक्त येथे मोठ्या प्रमाणात गर्दी करत असतात.आषाढीएकादशी निमित्त विठुरायाच्या दर्शनाला निघालेल्या पालखी च्या स्वागतासाठी गावकरी मंडळी तयारी करत आहेत.गावकरी मोठ्या उत्साहात पालखी चे फटाक्याची आतिश बाजी करीत स्वागत करतात हरिनामाच्या गजरात,अश्व,मंगल वाद्या सह गाव प्रदक्षिणा करत ही पालखी दरवर्षी गोटेगाव येथे दुपारी हनुमान मंदिर समोर दर्शनासाठी असते.अत्यंत शिस्तबद्ध असलेला हा पालखी सोहळा गोटेगाव व आजूबाजूच्या गावातील लोकांना आपण पंढरीत असल्याची अनुभूती करूनदेतो.यापरिसरातील अबाल वृद्ध पालखी सोहळ्याचे दर्शन घेण्या साठी व पाहण्यासाठी गर्दी करतात.वेगवेगळ्या साहित्याची दुकाने



येथे थाटली जातात.एक प्रकारची यात्रा भरल्या सारखे वाटते.गावकरी पालखी सोबत असलेल्या वारकरी व इतर खेड्या पाड्यातून आलेल्या नागरिकांची महाप्रसादाची उत्तम अशी व्यवस्था करतात.प्रत्येक जण आपल्या घरचा सोहळा असल्यासारखे यात उत्साहाने सहभागी होतात.चार जुलै रोजी येणाऱ्या गोटेगाव येथील गजानन महाराजांच्या पालखीचे दर्शन व सोहळा पाहण्यासाठी आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन गोटेगावकरांनी केले आहे.गोटेगाव येथे महाप्रसाद घेतल्यानंतर शिस्तबद्ध पद्धतीत पालखी कळंब कडे मार्गस्थ होते.

ज्योतीताईंनी विधानसभा लढवावी-कार्यकर्त्यांच्या भावना

थांबून चालणार नाही, प्रस्थापितांविरुध्द संघर्ष अटळ-ज्योतीताईंचा निर्धार

बीड । दिव्य रिपोर्टर

स्व.विनायकराव मेटे साहेबांनी निर्माण केलेले साम्राज्य वाया जावू द्यायचे नाही ही तमाम शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांची भावना होती. त्यामुळे हा शिवधनुष्य पेलण्याचा प्रयत्न केलेला असल्याचे सांगून ना उमेद न होता, न खचता आपल्याला ही लढाई लढायची आहे.आपल्याला थांबून चालणार नाही. प्रस्थापितांविरुध्द संघर्ष करायचा आहे आणि तो संघर्ष अटळ आहे ही खूनगाठ आपल्याला मनाशी बांधायची आहे असा निर्धार शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई मेटे यांनी आज केला.

बीड येथे स्व.विनायकरावजी मेटे साहेब यांच्या समाधीस्थळ परिसरात आज दुपारी कृतज्ञता सप्ताह समारोप्रसंगी डॉ.ज्योतीताई मेटे बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील, मराठावाडा गौरव पुरस्कार प्राप्त अभिनेत्री प्रतिक्षा लोणकर, माजी आ.सिराज देशमुख, माजी आ.उषाताई दराडे, आशुतोष विनायकराव मेटे, सर्व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, शिवसंग्रामचे कार्यकर्ते, सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ.ज्योतीताई मेटे म्हणाल्या,दरवर्षी मेटे साहेबांचा ३० जुनला वाढदिवस साजरा व्हायचा. तो प्रत्येक वाढदिवस मी व्यासपिठाच्या समोरून अनुभवयाचे. हा प्रघात गेल्या २२ वर्षापासून सुरू होता. मात्र आज व्यासपीठावर उभे राहून मी संवाद साधत आहे. समोर मेटे साहेबांचे स्मृतीस्थळ आहे. आणि असे वाटते की, त्याठिकाणाहून साहेब आपल्या सर्वांना पाहत आहेत. समाजात पेरेल्या चांगुलपणाचे फलित म्हणून आज पाऊससुध्दा होत आहे. मेटे साहेबांनी निर्माण केलेले साम्राज्य वाया जावू द्यायचे नाही.

ही तमाम शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांची भावना होती. त्यामुळेच हा शिवधनुष्य पेलण्याचा प्रयत्न केलेला आहे.समाजाच्या प्रश्नावर लढत असतांना, कुठेही मी माझ्या जातीसाठी लढत आहे. हा न्युनंगड न बाळगता छातीठोकपणे समाजासाठी लढतोय हे सांगणारे मेटे साहेब होते. समाज हाच त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदु होता. साहेबांनी त्यांच्या संघर्षाचा वसा अलगदपणे आपल्या पदरात

टाकला आहे. नाव उमेद न होता. न खचता आपल्याला आपली लढाई लढायची आहे असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी प्रभाकरअप्पा कोलंगडे यांनी तमाम शिवसंग्रामचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्यावतीने भावना व्यक्त करतांना म्हटले की, कुठल्याही परिस्थितीमध्ये ज्योतीताईंनी विधानसभेची निवडणूक लढवली पाहिजे. जिथे-जिथे शक्य असेल तिथे शिवसंग्रामने आपली ताकद दाखवली पाहिजे. दादांनी ज्यांना आशिर्वाद दिले त्यांनी यशाची प्राप्ती केली. त्यामुळे या अभिवादन सभेच्या निमित्ताने एवढेच सांगेल की, मनोज दादांनी सहकार्य करावे, ज्योतीताईंनी निवडणूक लढवावी आणि या जिल्ह्यात इतिहास घडवावा. लोकसभेमध्ये जसा इतिहास घडला तोच इतिहास विधानसभेतही घडावा असे प्रभाकरअप्पा कोलंगडे यांनी सांगितले.

अॅड.रविंद्र गवारे यांच्या युक्तीवादामुळे मारहाणीच्या प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता

गेवराई । प्रतिनिधी

शहरातील कोल्हेर रोड येथे दि. ०५/०७/२०१९ रोजी फिर्यादी शामराव भाऊसाहेब राठोड यांना मारहाण केल्याची घटना घडली. सदर प्रकरणातील आरोपी अप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांनी गाडी आडवुन मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्याविरुद्ध कलम ३४१,३२३, ५०४,५०६, भा.द.वी. प्रमाणे गुन्हा पोलीस स्टेशन गेवराई येथे दाखल करण्यात आला होता.

सदरील गुन्ह्यातील आरोपी आप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांच्या वतीने अॅड.रविंद्र गवारे यांनी काम पाहुण सदरील गुन्हा खोटा दाखल असल्याचे ठोस पुरावे / कागदपत्र दाखल करुन भक्कमपणे बाजु मांडली त्यामुळे गेवराई प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी निलेश रणदिवे साहेब यांनी सदर गुन्ह्यातील आरोपी अप्पासाहेब गावडे यांची निर्दोष मुक्तता केल्याची माहिती अॅड.रविंद्र गवारे यांनी दिली आहे.

सविस्तर असे की पाचेगाव तिरुपती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शामराव भाऊराव राठोड यांनी स्वताच्या संस्थेतील शिक्षक अप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांनी संस्थेचे मुख्यध्यापक यांच्याकडे रजा मागितले असता संस्थाचालकाच्या म्हणण्यावरुन त्यांनी आरोपी अप्पासाहेब गावडे यांना रजा दिली नाही. या शिल्लक कारणावरून शहरातील कोल्हेर रोड गेवराई येथे दि. ०५/०७/२०१९ रोजी फिर्यादी शामराव राठोड यांना आरोपी आप्पासाहेब गावडे यांनी गाडी आडवुन मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली.त्यानंतर अप्पासाहेब गावडे यांच्या विरुद्ध ३४१,३२३, ५०४,५०६, भा.द.वी. प्रमाणे गुन्हा पोलीस स्टेशन गेवराई येथे दाखल करण्यात आला होता.त्या गुन्ह्यातील आरोपी आप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांच्या वतीने अॅड.रविंद्र गवारे यांनी सदरील गुन्हा खोटा दाखल केल्याचे ठोस पुरावे / कागदपत्र दाखल करुन जोरदार युक्तीवाद केले आहे. त्यामुळे गेवराई प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी निलेश रणदिवे साहेब यांनी सदर गुन्ह्यातील आरोपी अप्पासाहेब गावडे यांची निर्दोष मुक्तता केल्याची माहिती अॅड.रविंद्र गवारे यांनी दिली आहे. यावेळी अॅड.अभय शिंदे,अॅड.शेख हारुण, अॅड.गणेश गवारे यांनी सहकार्य केले.

सत्ताधाऱ्यांना पोलिसांचे अभय!

बँक मॅनेजरला कॅबिनमध्ये घुसून मारहाण करणारे आरोपी मोकाटच!

बीड । प्रतिनिधी

कर्ज प्रकरणाच्या फाईलमध्ये त्रूटी काढल्याने वडवणी येथील एसबीआय बँकेच्या मॅनेजरला कक्षात घुसून मारहाण करणारे वडवणीच्या माजी नगराध्यक्षाचा मुलगा आणि भाजप कार्यकर्ता धनराज मुंडे व अरूण मुंडे हे दोघेही पाच दिवसानंतरही मोकाटच आहेत. त्यांच्या अटकेसाठी बीडमध्ये बँक कर्मचाऱ्यांनी मोर्चाही काढला होता, परंतू वडवणी पोलिसांनी सत्ताधारी पक्षाचा असल्याने त्यांना अभय देण्याचा प्रकार केला आहे. सामान्यांना खाकीचा धाक दाखविणारे पोलिस सत्ताधाऱ्यांना अटक करत नसल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या प्रकरणातून समोर आले आहे. त्यामुळे पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्न उपस्थित होऊन विश्वास कमी होत चालला आहे.

वडवणी येथील एसबीआय बँकेचे शाखा प्रबंधक युवराज पाटील यांना मारहाण केल्याची घटना २४ जून रोजी घडली होती. याप्रकरणी वडवणी पोलिस ठाण्यात भाजप कार्यकर्ता धनराज राजेभाऊ मुंडे आणि त्यांचा सहकारी अरूण मुंडे यांच्यावर वडवणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर २७ जून रोजी या दोघांना अटक करून कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी जिल्ह्यातील सर्व बँकिंग अधिकारी व कर्मचारी संघटनांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. तरीही वडवणी पोलिसांनी या दोघांना अटक केलेली नाही. त्यामुळे कामगिरीवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांना कक्षात घुसून शिवीगाळ केल्याप्रकरणी बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यातही अटक झाली नव्हती. ही घटना ११ मे २०२३ रोजी घडली होती.

बँक कर्मचारी कामबंदच्या तयारीत

धनराज मुंडे व अरूण मुंडे यांच्यावर गुन्हा दाखल झाला. त्यांच्या अटकेसाठी मोर्चा काढूनही वडवणी पोलिसांनी याकडे दुर्लक्ष करत आरोपींना अटक केली नाही. त्यामुळे संतापलेले बँक कर्मचारी आता कामबंद करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे पोलिसांनी वेळीच लक्ष देऊन आरोपींना अटक करावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांमधून होत आहे. दरम्यान, याबाबत वडवणीचे सहायक पोलिस निरीक्षक अमन सिरसाट यांना फोनवरून संपर्क केला. परंतू त्यांचा फोन न लागल्याने बाजू समजली नाही.

चौकशी करू

मी स्वत: या प्रकरणात लक्ष घालून आहे. आरोपी कोणीही असो, आम्ही त्याला अटक करणारच आहोत. आमचे प्रयत्न सुरूच आहे. काही चुकीचे प्रकार घडतात, हे ऐकून वाईट वाटते. आमचेही पोलिस जर पाठिशी घालत असतील तर चौकशी करू.

धीरजकुमार बच्चू, सहायक पोलिस अधीक्षक माजलगाव

गोळीबाराचे कारण स्पष्ट आर्थिक कारणावरून गोळीबार

राष्ट्रवादी (शरद पवार) गटाचे नेते बबन गित्ते यांच्यावर गुन्हा

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मरळवाडी गावचे सरपंच बापू आंधळे यांच्यावर शनिवारी शहरातील बँक कॉलनीत रात्री ९ च्या सुमारास गोळीबार करण्यात आला असून यात बापू आंधळे यांचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी आता राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) उपाध्यक्ष शशिकांत उर्फ बबन गित्ते यांच्यासह पाच जणांविरुद्ध खुनाचा व खून करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा परळी शहर पोलिस ठाण्यात रविवारी सकाळी दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाने शहरात सर्वत्र खळबळ माजली असून विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्यासह पोलीस पोलीस अधीक्षक अन्य वरिष्ठ पोलीस अधिकारी शहरात तळ ठोकून आहेत.दरम्यान रविवार दि ३० रोजी आरोपीच्या आटकेसाठी पोलिस ठाण्यासमोर मोठा जमाव जमा झाला होता.

गोळीबाराच्या या घटनेत जखमी असलेल्या ग्यानबा ऊर्फ गोट्या मारोती गित्ते (वय ३६ वर्ष, रा. नंदागौळ) हा जखमी झाला असून त्यांच्यावर अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात उपचार चालू आहेत. या जखमीचा पोलिसांनी जबाब नोंदविला आहे.ग्यानबा गित्ते यांनी परळी शहर पोलिस ठाण्यात फिर्यादीत असे सांगितले आहे की, पाच जणांनी संगनमत करून शहरातील बँक कॉलनी परिसरात सरपंच बापू आंधळे व ग्यानबा गित्ते या दोघांना बोलावून घेतले. यावेळी बापू आंधळे यांना तू पैसे आणलेस का, असे बबन गित्ते म्हणाले. तेव्हा पैशांच्या कारणावरून त्यांच्यात वादावादी झाली आणि यावेळी बापू आंधळे यांच्यावर बबन गित्ते यांनी कमरेचा पिस्तूल काढून डोक्यात गोळी मारली व दुसऱ्या एकाने कोयत्याने मारून बापू आंधळे यांना जिवंत ठार मारले. तसेच ग्यानबा गित्ते यास तिसऱ्याने छातीत गोळी मारून जखमी केले.ही घटना शनिवारी रात्री ८.३० सुमारास घडली. या घटनेने शनिवारी रात्री शहर हादरले होते.

या प्रकरणी ग्यानबा गित्ते यांच्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ◀◀ पान ३ वर

ओसाका जपान जागतिक ऑनलाइन अबॅकस आयोजित चॅम्पियनशिपमध्ये मयंक शैलेश चौधरीने मिळवले सर्वोत्कृष्ट ट्रॉफी आणि सायटेशन पारितोषिक

बीड । प्रतिनिधी

बालकांच्या विविध कलागुणांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने, सुप्तगुणांचा विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. देशामध्ये जापनीज अबॅकसची जास्त शिकवण पद्धतीत प्रचलित असल्यामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास सातत्यपूर्ण अभ्यासातील क्षमता वाढत असते. अबॅकस आणि वैदिक मॅथ्स सारख्या पद्धतीमुळे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये

विद्यार्थ्यांमधील जन्मताच गुणांना संधी निर्माण करून दिली जाते. जागतिक स्तरावरील चे अरमन इंटरनॅशनल अबॅकस इन्स्टिट्यूट ओसाका जपान, मियाजमा अबॅकस इन्स्टिट्यूट ओसाका जपान, तैवान चेंबर्स ऑफ कॉमर्स, ओसाका चेंबर्स ऑफ कॉमर्स, पेन पॅसिफिक अबॅकस चीन तसेच अबॅकस अर्थमॅटिक अकॅडमी आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन यांच्या सहकार्याने व समन्वयाने २६ मे २०२४ च्या चॅम्पियनशिपमध्ये मयंक शैलेश चौधरीने किड्स सेकंडलेवल मध्ये भाग घेऊन ८२० गुण मिळवून जागतिक स्तरांमधील सर्व द्वितीय येऊन पहिल्या तीन मध्ये सर्वोत्कृष्ट क्रमांक मिळविला आहे. अबॅकस जागतिक स्पर्धेमध्ये जपान चीन साऊथ कोरिया तैवान, भारत, श्रीलंका, सौदी अरेबिया, इराण, नॉर्वे, यु एस ए, मोरोक्को, सिंगापूर, मलेशिया, साऊथ आफ्रिका, कॅलिफोर्निया, नेपाळ, अशा एकूण १५ देशांमधील दोनहजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सहभाग नोंदवला असून सदरील स्पर्धा आणि बक्षीस वितरण कार्यक्रम फेसबूक, ट्विटर, यूट्यूब, झूम अशा सर्व चॅनल्सवर प्रसारित करण्यात आलेला होता. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अतिशय प्रतिष्ठित समजले ◀◀ पान ३ वर

नेकनूर जवळ एसटी बसची मोटारसायकलला पाठीमागून धडक,लग्नाला गेलेल्या युवकाचा जागीच मृत्यू तर एक जखमी

नेकनूर । प्रतिनिधी

बीड केज रोडवरील जवळ एसटी बसची मोटारसायकलला पाठीमागून धडक लागून युवकाचा जागीच मृत्यू तर एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. ही घटना बीड केज रोडवरील येळंब घाट येथे दि.२९ जून रोजी सायंकाळी ६.०० वाजताच्या दरम्यान घडली आहे. दिपक नवनाथ गाढवे (वय २२ रा. पाटोदा(म.) ,ता. अंबाजोगाई, बीड) असं अपघातात मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. नवनाथ हरिभाऊ गाडवे हे जखमी झाले असून त्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय

रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे

मिळालेल्या माहितीनुसार दिपक व वडील नवनाथ गाडवे हे त्यांच्या युनिक्रॉन मोटारसायकलवर मेव्हणीच्या मुलीच्या लग्नाला कपिल धार येथे गेले होते. लग्नाचा कार्यक्रम आटोपून गावी (पाटोदा(म.) अंबाजोगाई) कडे जात असताना बीड-केज रोडवरील येळंब घाट येथे एसटी बसचा पाठीमागून धक्का लागला यात दिपकचा जागीच मृत्यू झाला. जखमी नवनाथ यांना तात्काळ रुग्णवाहिकेने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. एकंदरीत बीड केज रोडवर अपघाताच्या घटना वाढत आहेत.

महापारेषण चे अधिक्षक अभियंता मिलिंद बनसोडे सेवानिवृत्त

परळीत काम करताना आनंद व समाधान वाटले: व्यक्त केली कृतज्ञ भावना

परळी । प्रतिनिधी

महापारेषण कंपनीच्या येथील अतिउच्च दाब सं व सू मंडळाचे अधीक्षक अभियंता मिलिंद बनसोडे हे सेवानिवृत्त झाले त्याबद्दल २८ जून रोजी येथील कार्यक्रमात त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी छत्रपती संभाजी नगर परिमंडळाचे मुख्य अभियंता नसीर कादरी, महापारेषण (संचलन)चे माजी संचालक यु.जी .झाल्टे महापारेषण (संचलन) चे माजी कार्यकारी संचालक रोहिदास मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत मिलिंद बनसोडे यांचा महापारेषण परळीच्या अधिकारी, ◀◀ पान ३ वर

आरोपीला पावसापासून वाचविण्यासाठी कंबरेपासून वाकले पोलीस

बीड । प्रतिनिधी

सर्वसाधारण प्रकरणात आरोपीला हाडतूड करणारे,प्रसंगी अर्वाच्च भाषा वापरणारे पोलीस सर्वांनाच ज्ञात आहेत. मात्र एखादा आरोपी 'हायप्रोफाईल' असेल तर त्याला पाऊस लागू नये यासाठी पोलीस कसे कंबरेपासून वागतात याचे प्रदर्शन शनिवारी बीडमध्ये पाहायला मिळाले.एखाद्या आरोपीला इतके सौजन्य दाखविण्याचे 'ज्ञान' पोलिसांना होण्यामागचे कारण काय याचीच चर्चा न्यायालय परिसरात होत होती.

बीड जिल्हा पोलीस दलाबद्दल फारसे चांगले बोलण्याची परिस्थिती राहिलेली नाही.कोणत्या आरोपीला कधी अटक करायचे याचे 'टायमिंग' सुद्धा चर्चेचा विषय ठरलेले आहे. ◀◀ पान ३ वर

पोलीस अधीक्षकांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह

एखादा सामान्य आरोपी असेल तर पोलीस त्याच्याशी कसे वागतात,त्याला केवळ वडापाव खाऊन पोलीस कोठडीत रात्र कशी काढावी लागते यात काही नवीन नाही. मात्र हायप्रोफाईल आरोपीच्या बाबतीत पोलिसांकडून शाही बडदास्त ठेवण्याचे अनेक प्रकार मागच्या काही दिवसात समोर आले आहेत. अगदी एखाद्यावर गुन्हा दाखल होणे लांबविण्यासाठी पोलीस अधिकारीच मांडवलीच्या बैठका घेताना जिल्ह्याने पाहिले आहे. ठेवीदारांची समजूत पोलीस अधीक्षक काढतात हे देखील जिल्ह्याने पहिले आहे. ही सारी 'कृतज्ञता' नेमकी कशासाठी आणि 'नंदा'च्या गोकुळात 'राधा' जशी कृष्णासाठी काहीही करायला तयार असायची तसे पोलीस काही आरोपींची काहीही करायचे 'ज्ञान' नेमके कोणाकडून घेत आहेत,पोलीस अधीक्षक या साऱ्या प्रकाराला मूक संमती का देत आहेत हा प्रश्न सामान्यांना पडला आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे विश्रांतवाडीत भक्तिमय वातावरणात स्वागत

विश्रांतवाडी । प्रतिनिधी

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे विश्रांतवाडी परिसरात आगमन होताच भाविक भक्तांच्या वतीने पालखीचे भक्तिमय वातावरणात व जल्लोषात स्वागत करण्यात आले. रथाचे चाक पंक्चर झाल्याने या वर्षी पालखीचे थोडे उशिरा आगमन झाले. दोनच्या सुमारास म्हस्के वस्ती येथे पालखीचे आगमन झाले. तेथे पुणे महानगपालिकेतर्फे येथे स्वागत करण्यात आले. आयुक्त राजेंद्र भोसले, सहआयुक्त बी.पी. पृथ्वीराज यांनी पालखीचे स्वागत केले. यावेळी उपआयुक्त माधव जगताप, उपआयुक्त किशोरी शिंदे, सहायक आयुक्त चंद्रसेन नागटिळक आदी अधिकारी उपस्थित होतें. दुपारी अडीचच्या सुमारास पालखीचे विश्रांतवाडीत आगमन झाले. महिलांच्या वतीने रांगोळी काढण्यात आल्या होत्या. अनेक ठिकाणी मंडप उभारण्यात आले होते. यादरम्यान लष्कराच्या वतीने फळांच्ये व पाणीवाटप वारकऱ्यांना करण्यात आले. त्यासाठी करआकारणी केंद्राजवळ स्वागत कक्ष, वैद्यकीय कक्ष, हिरकणी कक्ष व वारकर्यांसाठी विसावा कक्ष उभारण्यात आले होते.

स्वराज्य पक्षातर्फे फराळ व फळवाटप आणि छत्री वाटप करण्यात आले. तसेच आरोग्यसेवा देण्यात आली. जितेंद्र जगताप मित्र परिवारातर्फे वारकऱ्यांना खाऊवाटप, राजगिरा लाडूवाटप व पाणीवाटप केले. हजरत हुसैन शाह बाबा लंगर कमिटी व हजरत हुसैन शाह बाबा भटारी संघटनेतर्फे लाडू वाटप करण्यात आले. अध्यक्ष फईम शेख, शब्बीर शेख, रिजवान इनामदार यांनी आयोजन केले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रभाग क्रमांक २, वडगावशेरी विधानसभा मतदारसंघ यांच्या वतीने वारकऱ्यांना आरोग्यसेवा, फराळ व पाणीवाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना उपनेत्याप्रा.सुषमा अंधारे, शहरप्रमुख संजय मोरे, उपशहरप्रमुख आनंद गोयल, माजी गटनेते संजय भोसले, माजी नगरसेवक सागर माळकर, डॉ.रसिक शेटीया, डॉ.आशा शेटीया, डॉ.सुहास बुलबुलेआदी मान्यवर उपस्थित होते. युवासेना शहर चिटणीस अक्षय सागर माळकर यांनी आयोजन केले.

शिवराज मित्र मंडळातर्फे अन्नदान करण्यात आले. याचे शिवाजी काळूराम देवकर यांनी आयोजन केले होते. आप पक्षातर्फे अमित म्हस्के व इतर कार्यकर्त्यांनी फराळवाटप करण्यात आले.

सुरेंद्र पठारे मित्रपरिवारतर्फे नाष्ट्याची सोय केली होती. याचे आयोजन अजहर खान, अतिश रणपिसे, सूरज मौर्या, सुशील रणपिसे, आतिश ढसाळ, राहुल कदम, रोहित धेंडे, रितेश गायकवाड, वैभव पांडे, निलेश गायकवाड, यश घनवट यांनी केले. वडगाव शेरी मतदार संघाचे आमदार सुनील टिंगरे,भाजपचे जगदीश मुळीक, संतोष खांदवे,सुनील खांदवे,रावसाहेब रागापसरे,अनिल नवले, माजी नगरसेविका रेखा टिंगरे,यांच्यावतीनेदेखील वारकऱ्यांचे परिसरात जल्लोषात स्वागत करण्यात आले.येरवडा डॉक्टर्स असोसिएशन, केदारनाथ हॉस्पिटल व चंद्रकांत जंजिरे प्रतिष्ठानतर्फे फराळवाटप, औषधवाटप व आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. काँग्रेसतर्फे पाणीवाटप व आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

यादरम्यान विविध पक्ष व संघटनांच्या वतीने विविध उपक्रमासह फळ व पाणीवाटप करण्यात आले. परिसरात खेळणी, झोके व्यावसायिकांनी थाटल्याने परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

यादरम्यान पुणे शहर पोलिसांच्यावतीने कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता तर शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्वतःहून या मार्गाची पाहणी केली. यादरम्यान शहर पोलिसांच्या वतीने सुमारे ३५० पोलिस बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते.पालिकेच्या वतीने ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था वारकऱ्यांसाठी करण्यात आली होती. तर पालिका साफसफाई विभागाच्या वतीने सफाई कामगार नेमण्यात आले होते. यावेळी लाखोंच्या संख्येने भाविकांनी दर्शनाचं लाभ घेतला. येरवडा,खडकी,संगमवाडी या भागाकडे जाणारे मार्ग पोलिसांच्या वतीने बंद करण्यात आले होते.

माजी भूमी अभिलेख उपसंचालकासह पत्नीवर गुन्हा

पुणे । प्रतिनिधी

बेहिशोबी मालमत्ता जमविल्याप्रकरणी नागपूर भूमी अभिलेखच्या तत्कालीन उपसंचालकासह पत्नीवर येरवडा पोलिस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुन्हा दाखल केला आहे. दादाभाऊ सोनू तळपे (वय ६२, रा. तत्कालीन उपसंचालक भूमी अभिलेख, नागपूर), पत्नी कल्पना दादाभाऊ तळपे (वय ५८, रा. दोघे हरमस हेरिटेज-११ येरवडा) अशी दोघांची नावे आहेत. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक प्रवीण निंबाळकर यांनी फिर्याद दिली आहे.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, दादाभाऊ तळपे हे भूमी अभिलेख विभागात नोकरीस होते. तळपे यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत पुणे एसीबी कार्यालयाकडून उघड चौकशी करण्यात आली होती. तळपे यांनी संपादित केलेल्या मालमत्ता कायदेशीर पद्धतीने संपादित केल्या आहेत की नाही? याबाबत त्यांना वेळोवेळी संधी देऊन माहिती देण्यास सांगितले होते. मात्र, तळपे यांनी संपादित केलेल्य मालमत्तेबाबत उपयुक्त पुरावे ते सादर करू शकले नाहीत. त्यांनी भूर्म अभिलेख विभागात कार्यरत असतान आपल्या कार्यकाळात कायदेशीर उत्पन्नापेक्षा स्वतःच्या व पत्नीच्या नावे २८ लाख ५२ हजार ५४१ (ज्ञात उत्पन्नापेक्षा १८.७४ टक्के) किमतीच अपसंपदा भ्रष्ट मार्गाने जमवल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. बेहिशोब मालमत्ता संपादित करण्यासाठी दादाभाऊ तळपे यांना त्यांची पत्नी कल्पना तळपे यांनी गुन्हा करण्यास प्रोत्साहित केले. त्यामुळे पुणे एसीबीने दोघांवर येरवड पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम १३(१) (ई), १३ (२) सह भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, भादंवि १०९ नुसार गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक श्रीराम शिंदे करत आहेत.

आडकर फाउंडेशनतर्फे रीना पाटील यांना पुरस्कार

पुणे, ता. ३० : दृष्टिहीनतेवर मात करून स्वतःच्या पायावर उभ्या असलेल्या रीना पाटील यांना आडकर फाउंडेशनतर्फे दिला जाणारा 'डॉ. हेलन केलर स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ तसेच नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ ऑफ्थेल्मॉलॉजीचे संस्थापक डॉ. श्रीकांत केळकर यांच्या हस्ते झाले.

दृष्टिहीन सामाजिक कार्यकर्त्या डॉ. हेलन केलर यांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. नॅशनल फेडरेशन ऑफ ब्लाइंडचे राष्ट्रीय सल्लागार दिलीप शेलवंते, मैथिली आडकर, अरुणा केळकर आदी उपस्थित होते. प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविकात फाउंडेशनच्या कार्याची माहिती दिली. त्यानंतर 'अंधारातून प्रकाशाकडे' या विषयावर कविसंमेलनाचे आयोजन केले होते. यात श्रीनिवास शारंगपाणी, वासंती वैद्य, राजश्री लेले, स्वप्नील पोरे, सौदामिनी साने आदींचा सहभाग होता. वैजयंती आपटे व निरुपमा महाजन यांनी सूत्रसंचालन केले.

मेट्रोतही घुमला हरिनामाचा गजर

पुणे । प्रतिनिधी

पांढरेशुभ्र कपडे, कपाळी गंध-टिळा अन हातात भगव्या पताका घेऊन पंढरीकडे निघालेल्या वारकऱ्यांनाही पुण्यातील मेट्रोची भुरळ पडली. मेट्रो स्थानकावरील लिफ्ट, सरकत्या जिन्यांवरून तिकीट घर अन तिकीट घेतल्यानंतर अडखळत, कावरे-बावरे होत आपोआप उघडणारा दरवाजा त्यांच्यासाठी अप्रूप होता. अशा भारावलेल्या अवस्थेत त्यांची पावले मेट्रोमध्ये शिरली आणि थंडगार मेट्रोतून आयुष्यातील प्रवासाचा पहिला आनंद त्यांनी लुटला. वारकऱ्यांच्या भजन-कीर्तनाने मेट्रोतही हरिनामाचा गजर घुमला.

संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी सोहळा रविवारी पुण्यात दाखल झाला. पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी विविध दिंड्यांमध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांना मागील वर्षीप्रमाणे यावर्षीही मेट्रोने भुरळ घातली होती. दिंडीसमवेत पायी जातानाच काही तरुण वारकऱ्यांनी, ज्येष्ठ नागरिक, महिलांना आपल्यासमवेत घेऊन मेट्रोच्या प्रवासाची सफर करण्याचा आनंद लुटला. पिंपरी- चिंचवड, नाशिक फाटा, बोपोडी या ठिकाणांसह नगर रस्ता, कल्याणीनगर, पुणे रेल्वे स्थानक अशा ठिकाणांहून वारकरी मेट्रोतुन प्रवास करण्यासाठी येत होते.

मेट्रो स्थानकापासून ते प्रत्यक्षात मेट्रोमध्ये बसण्यापर्यंत गोंधळून गेलेल्या वारकऱ्यांना मेट्रोने नेहमी प्रवास करणाऱ्या प्रवाशांनीही सावरून घेतले. मेट्रो स्थानकावरील लिफ्ट, सरकते जिने, मेट्रोमध्ये प्रवेश करण्यापासून ते उतरण्यापर्यंतचे मार्गदर्शन सहप्रवाशांकडून केले जात होते. अनेक वारकऱ्यांनी तर मेट्रोने प्रवास करायचाच, असा निश्चय करून मेट्रोतुन प्रवास केला. काही ठिकाणी अडचण आल्यानंतर मेट्रोच्या कर्मचाऱ्यांकडूनही वारकऱ्यांना सहकार्य करण्यात आले. एकूणच पालखी सोहळ्याच्या निमित्ताने पुण्यात दाखल झालेल्या वारकऱ्यांनी मेट्रोतुन प्रवास करण्याचा आनंद लुटला.

'जवान' चित्रपटाच्या आठवणींना उजाळा

वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या लक्षणीय होती. अनेकांनी बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान याचा 'जवान' हा चित्रपट पाहिलेला होता. या चित्रपटामध्ये दाखविण्यात आलेली मेट्रो, वल्लभनगर मेट्रो स्थानकाचे नाव, यामुळेही त्यांच्यात मेट्रोचे आकर्षण होते. मेट्रोतुन प्रवास करताना, विशेषतः शिवाजीनगर ते न्यायालय दरम्यानच्या भुयारी मार्गातील प्रवासावेळी त्यांनी चित्रपटाच्या आठवणीला उजाळा दिला.

कोळवण येथे नावनोंदणी शिबिरात ८० जणांचा सहभाग

कोळवणः येथील ग्रामपंचायत कार्यालय सभागृहात तीन दिवसीय शिबिरात सरकारी योजनांबाबत लोकांमध्ये जागरूकता यावी, या उद्देशातून मावळ व मुळशी तालुक्यामध्ये सरकारी योजना जागरूकता व नोंदणी शिबिराची सुरुवात मुळशी तालुक्यातील कोळवण येथून झाली.

श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत येणाऱ्या दत्तोपंत ठेंगडी राष्ट्रीय श्रमिक शिक्षा व विकास बोर्ड प्रादेशिक संचालनालय पुणे मुळशी तालुका पत्रकार संघ पंचायत समिती मुळशी व ग्रुप ग्रामपंचायत कोळवण यांच्या माध्यमातून तसेच युनिक पाथस कृषी पर्यटन केंद्राच्या सहकार्याने कामगार शिक्षण व विकासाचे कार्यक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून या आर्थिक वर्षात ई-श्रम कार्ड व इतर सरकारी योजनांची

जागरूकता व नोंदणी शिबिरांचे आयोजन पुणे जिल्ह्यातील मावळ व मुळाशी तालुक्यातील गावात करण्यात येणार आहे, अशी माहिती या विभागाच्या प्रभारी प्रादेशिक संचालिका सारिका डफरे यांनी दिली आहे.

युनिक पाथ पर्यटन संस्थेचे संचालक, श्रम व रोजगार मंत्रालय भारत सरकारचे विभागीय सल्लागार समिती सदस्य दत्तात्रेय शेळके यांच्या विनंतीनुसार या दोन तालुक्यांची निवड केली आहे. शासनाच्या विविध विभागांच्या सहकार्याने व समन्वयाने या शिबिरे गाव पातळीवर जाऊन तेथील ग्रामस्थांना विविध सरकारी योजना अंतर्गत नोंदणी करण्याचे कार्य केले जाईल. प्रत्येक गावांत तीन दिवसांसाठी हे शिबिर आयोजित करणार आहे, कोळवणमधील शिबिरात ८० जणांनी विविध योजनांसाठी सहभाग नोंदवला होता. भारत सरकार श्रम व रोजगार मंत्रालयाचे प्रादेशिक संचालिका सारिका डफरे, महाराष्ट्र शासनाचे विभागीय पर्यटन कार्यालयाचे उपसंचालक शमा पवार, जिल्हा उद्योग केंद्र उद्योग निरिक्षक शैला वानखेडे, भारत सरकार श्रम व रोजगार मंत्रालयाचे प्रादेशिक सल्लागार समितीचे सदस्य दत्ता शेळके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी धनश्री पालकर, सरपंच ग्रामसेवक गजानन जाधव, सुरेश धिडे, कोळवण ग्रामपंचायत सदस्य पंकज धिडे, रामदास पडवळ, माजी उपसरपंच ग्रुप ग्रामपंचायत कोळवण हरिभाऊ धिडे, संचालक वैष्णवी कृषी पर्यटन केंद्र काशिनाथ टेमघरे, दीपक शेळके, सूरज शेळके यांनी सहकार्य केले.

नवीन टर्मिनलच्या सुरक्षेचा प्रश्न निकाली : मुरलीधर मोहोळ

पुणे । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय विमानतळावर नव्याने साकारलेल्या टर्मिनलच्या सुरक्षेसाठी आवश्यक असणारे सीआयएसएफचे मनुष्यबळ गृह विभागाकडून मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे हे टर्मिनल लवकरच पुणेकरांसाठी खुले होणार आहे, अशी माहिती खासदार आणि केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे विमानतळावरून होणार्या उड्डाणांची गरज लक्षात घेऊन नवे टर्मिनल साकारले आहे. गेल्या काही महिन्यांपूर्वी त्याचे उद्घाटनही झाले. मात्र, सीआयएसएफच्या मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे या टर्मिनलचा प्रत्यक्ष वापर सुरू झाला नव्हता. मोहोळ यांनी केंद्रीय राज्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर लगेचच याप्रकरणी त्यांनी लक्ष घालून गृह विभागाकडे पाठपुरावा सुरू केला होता; शिवाय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन चर्चाही केली होती. या प्रयत्नांना यश आले आहे.

मोहोळ म्हणाले की, नवे टर्मिनल लवकर वापरात आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, पुणे विमानतळासाठी २२२ विविध पदांना मंजुरी मिळाली आहे. ही पदे वेगवेगळ्या सात प्रकारांची आहेत. या नव्या संख्येसह पुणे विमानतळासाठी आता सीआयएसएफच्या मनुष्यबळाची संख्या ७१५ वर गेली आहे. नव्या टर्मिनलसाठी आवश्यक असणारी संख्या आता पूर्ण झाली आहे. त्यामुळे हे टर्मिनल लवकर खुले होईल. मनुष्यबळ पुरविण्याची मागणी गृह विभागाकडून मान्य केल्याबद्दल गृहमंत्री अमित शहा यांचे पुणेकरांच्या वतीने धन्यवाद मानतो.

पुण्यात सध्या ड्रग विक्रीचे प्रकार सातत्याने उघड होत आहेत. कोयता गँगसारख्या विषयांमुळे गुन्हेगारी वाढत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. याबाबत विरोधी पक्षाकडून सातत्याने भाजपवर टीका केली जात आहे. या घटनांमुळे पुणे बदनाम होत आहे, याविषयी विचारले असता मोहोळ म्हणाले, या घटना घडल्या असल्या, तरी त्या रोखण्यासाठी सर्व प्रकारची कारवाई केली जात आहे. अशा विषयांत राजकारण न आणता पुण्यातील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी एकत्रित येऊन काम केले पाहिजे. पुणे शहराची बदनाम होईल असे वक्तव्य करणे राजकीय नेत्यांनी टाळावे.

समाजवादाच्या बाळकडूमुळे न्यायदानाच्या प्रक्रीयेत माझा हात थरथरला नाही -न्यायाधीश जी.डी.पारेख,ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ

पुणे । प्रतिनिधी

समाजवादासारख्या अनेक चळवळींमध्ये मी सक्रीय सहभागी असल्याने माझा विवेकवादी दृष्टिकोन विकसीत झाला. समाजवादी चळवळीने न्यायदानाच्या प्रक्रीयेत मला मार्गदर्शन केले, धैर्य दिले आणि माझा विवेक ढळू दिला नाही. समाजवादाच्या बाळकडूमुळेन्यायदानाच्या प्रक्रीयेत माझा हात थरथरला नाही, असे मतज्येष्ठ कायदेतज्ज्ञ न्यायाधीश जी. डी. पारेख यांनी व्यक्त केले.ज्ञान फौंडेशन, पुणेतर्फे दिवंगत ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येणारा लोकनेते भाई वैद्य स्मृतिगौरव पुरस्कार २०२४ यंदा ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ न्यायाधीश जी. डी. पारेख यांनाआज प्रदान करण्यात आला, त्यावेळी पुरस्काराला उत्तर देताना पारेख बोलत होते.

एस. एम. जोशी फौंडेशनच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावरकार्यक्रमाचे अध्यक्ष माजी संमेलनाध्यक्ष आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस, आरोग्य सेनेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ.अभिजीत वैद्य,ज्ञान फौंडेशन, पुणेचेअध्यक्षमनोहर कोलतेआणि शैलेंद्र भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळीशैलेंद्र भालेरावयांनी महावितरणला मुख्यमंत्री सौरऊर्जाकृषीवाहिनीप्रकल्पासाठी पुणे जिल्ह्यात विविध ठिकाणी पंधराशे १८ एकर जागा मिळवून दिल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी बोलतानान्यायाधीश जी. डी. पारेख म्हणाले की, जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेच्या रेट्यामुळे एकीकडे जीडीपी वाढत असला तरी बेकारी, महागाई, शेती, पाणीप्रश्न या प्रश्नांमुळे समाजातील विषमता वाढत आहे. सनातन संस्कृतीचे वाढते वर्चस्व आणि इतिहासाच्या पुनर्लेखनाबाबत आपण

जागल्याच्या भूमिकेत असलेपाहिजे. या लोकशाहीच्या वारीला रिंगणाबाहेर जाऊ न देण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर आहे.

यावेळी बोलतानाडॉ.अभिजीत वैद्य म्हणाले की, भाई वैद्य हे केवळ एक नाव नव्हते, तर तो एक विचार होता. तत्वांशी, विचारांशी बांधिलकी बाळगत, तडजोड न करता , २८ वेळा तुरुंगवास भोगलेले आणि पुण्याचे महापौरपद भूषवित असताना जेलमध्ये गेलेले भाई हे एकमेव महापौर असावे. भाईंनी माणसांना झपाटून टाकले. भाईंच्या परिसस्पर्शाने अनेकांच्या आयुष्याचेसोने झाले असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. या देशातील न्याय हरवला असून सध्या तो केवळ डोळ्यावर बांधलेल्या पट्टीपूरतातो उरलेलाआहे. न्यायधीश, न्यायमूर्ती या केवळ पदांच्या बिरूदावल्या शिल्लक आहेत, पण न्याय राहिलेला नाही. बलवानांच्या हिताचे रक्षण म्हणजे अशी उपहासाने कधीकाळी न्यायदानाची व्याख्या विशद केलेल्या कायदेतज्ज्ञाचीही व्याख्या आज प्रत्यक्षात आलेली दिसून येते.

यावेळी बोलतानाडॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, भाई वैद्य म्हणजे वैचारिक आणि कृतीशील आदर्श समाजवाद होता. समाजवादाचा सारांश म्हणजे भाई असे म्हटले जायचे. अत्यंत प्रामाणिक आणि सुधारक दूरदृष्टी लाभलेले भाई आदर्श राजकारणी होते. मानवतावादी, सत्यशोधक, पुरोगामी, समाजवादी आदी चळवळींचा केंद्रबिंदू म्हणजे भाई वैद्य होते.यावेळी शैलेंद्र भालेराव यांनी सत्काराला उत्तर देत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातज्ञान फौंडेशन, पुणेचेअध्यक्ष मनोहर कोलते यांनी पुरस्कार देण्यामागील भूमिका विशद केली. सूत्रसंचालन भागवत थेटे यांनी केले.

छायाचित्र ओळीः-ज्ञान फौंडेशन, पुणेतर्फे दिवंगत ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येणारा लोकनेते भाई वैद्य स्मृतिगौरव पुरस्कार २०२४ यंदा ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ न्यायाधीश जी. डी. पारेख यांनाआज प्रदान करण्यात आला. यावेळी (डावीकडून) मनोहर कोलते,डॉ. श्रीपाल सबनीस, पारेख आणि डॉ. अभिजित वैद्य.